पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

• वर्ष १६ • अंक ५० • बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 · Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 · Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

एका मिनिटात आयुष्य बदलू शकत नाही, परंतु एक मिनिट विचार करून घेतलेला निर्णय संपूर्ण आयुष्य बदलू शकतो.




# महाराष्ट्र ड्रग इन्स्पेक्टर परीक्षा रद्द!

## पेपर लीकचा आरोप, एमपीएससीने घेतला मोठा निर्णय

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**मुंबई :** आधीच देशभरात पेपर लीकमुळे वातावरण तापलेलं असतानाच आता महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएसी) कडून मोठा निर्णय घेण्यात आला आहे. 'फूड अँन्ड ड्रग्ज' विभागात 'ड्रग्ज इंस्पेक्टर' ग्रुप बी या पदाच्या भरतीसाठी आयोजित करण्यात आलेली परीक्षा रद्द करण्यात आली आहे. पेपरमध्ये अनियमितता आणि पेपर लीक झाल्याचा आरोप झाल्यानंतर या प्रकरणाचा तपास मुंबई क्राइम ब्रँचकडून सुरू करण्यात आला होता. या तपासात अनेक धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. प्राथमिक तपासात असं समोर आलं आहे की, ही परीक्षा सुरू होण्यापूर्वीच एका विद्यार्थ्याकडे या परीक्षेचा प्रश्नसंच पोहोचला होता. त्यानंतर आता ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. ड्रग इंस्पेक्टर




ग्रुप ब भरतीसाठी महाराष्ट्र शासनाने २९ जुलाई २०२५ जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्यानतंर मार्च २०२६ ला चाळणी परीक्षेचं आयोजन करण्यात आलं होतं. ही परीक्षा राज्यातील सहा विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. ही परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आली. मात्र या परीक्षेत गैरप्रकार झाल्याचा तसेच पेपर लीक झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. काही विद्यार्थ्यांकडे परीक्षेपूर्वीच प्रश्नसंच पोहोचल्याचा आरोप होत होता. विद्यार्थ्यांकडून सुरू असलेल्या आरोपाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून या संदर्भात २७ जुलै रोजी मुंबई पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. पोलिसांच्या प्राथमिक तपासात असं आढळून आलं की, ही परीक्षा सुरू होण्यापूर्वीच एका विद्यार्थ्याकडे या परीक्षेचा प्रश्नसंच पोहोचला होता, आणि त्याला त्याचा या परीक्षेत फायदा देखील झाला. त्यानंतर ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय आता महाराष्ट्र लोकसेवा आयोगने घेतला आहे.

### परीक्षार्थींना पुन्हा अर्ज करण्याची गरज नाही

दरम्यान आता ही परीक्षा पुन्हा एकदा घेतली जाणार आहे. त्यासंदर्भात लवकरच अधिकृत सूचना जारी केली जाणार आहे. दिलासादायक बाब म्हणजे आता विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा या परीक्षेसाठी अर्ज करण्याची गरज नाहीये, तसेच त्यांना कोणतंही शुल्क भरण्याची गरज नाहीये.

### पेपरफुटीला 'लव्ह स्टोरी'ची किनार!

एमपीएससी पेपर लीक प्रकरणाच्या तपासात एक चक्रावून टाकणारी माहिती समोर आली आहे. पेपर फुटीच्या आरोपांमुळे मंगळवारी रात्री एमपीएससीने औषध निरीक्षक, गट-ब पदासाठीची संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द केली. गेल्या काही दिवसांपासून या परीक्षेचा पेपर फुटल्याचे आरोप सुरु होते. या संपूर्ण प्रकाराला एक लव्ह स्टोरी कारणीभूत असल्याची माहिती पोलिस तपासात उघड झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एका प्रियकराने एमपीएससीमध्ये अगदी एका खालच्या कर्मचाऱ्याशी संधान साधून हा प्रकार केल्याचे बोलले जाते आहे. त्यामुळे फुटलेला पेपर केवळ एकालाच मिळाला, अशीही माहिती तपासातून पुढे आली आहे. पोलिस याचा अधिक तपास करीत आहेत.

# सुट्या तेल विक्रीवरील सरसकट बंदी टळली!

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

मुंबई : राज्यात खाद्यपदार्थांमधील भेसळ आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित नियमभंगाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने सुरू केलेल्या मोहिमेमुळे सुट्या खाद्यतेलाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुट्या खाद्यतेलाच्या विक्रीवर करण्यात आलेल्या कडक कारवाईमुळे छोट्या व्यापाऱ्यांमध्ये आणि रोजच्या गरजेनुसार कमी प्रमाणात तेल खरेदी करणाऱ्या ग्राहकांमध्ये चिंता निर्माण झाली.

या पार्श्वभूमीवर राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या विषयावर चर्चा झाली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरसकट बंदीचा मार्ग न स्वीकारता भेसळ रोखतानाच पारंपरिक तेल व्यवसाय आणि छोट्या ग्राहकांचे हित जपण्यासाठी स्वतंत्र मानक कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनाला दिले आहेत. म्हणजेच, राज्यात सुट्या खाद्यतेलाची विक्री पूर्णपणे बंद करण्याऐवजी आता त्यासाठी काही स्पष्ट नियम आणि गुणवत्ता निकष निश्चित केले जाण्याची शक्यता आहे.

सुट्या तेलावर सरसकट कारवाई झाल्यामुळे छोट्या दुकानदारांचा व्यवसाय अडचणीत येत असल्याच्या तक्रारी पुढे आल्या. विशेषतः ग्रामीण भागात तसेच कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांमध्ये ग्राहक एकावेळी मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करण्याऐवजी आपल्या दैनंदिन गरजेनुसार कमी प्रमाणात तेल घेतात. त्यामुळे प्रशासनाची कारवाई योग्य असली तरी त्याची अंमलबजावणी करताना सामान्य ग्राहक आणि छोट्या व्यापाऱ्यांचा विचार करावा, अशी मागणी मंत्रिमंडळात करण्यात आली.

## »थोडक्यात

### रुग्णालयातील आगीत 15 नवजात बालकांचा मृत्यू!

इस्लामाबाद: पाकिस्तानातील इस्लामाबाद येथील 'पाकिस्तान इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस' या रुग्णालयाच्या गायनेकोलॉजी वॉर्डमध्ये (स्त्रीरोग व बालसंगोपन विभाग) बुधवारी सकाळी भीषण आग लागली. या दुर्दैवी दुर्घटनेत १५ नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाला आहे. 'डॉन'च्या वृत्तानुसार, आग लागली तेव्हा वॉर्डमध्ये एकूण १६ नवजात बाळे होती. मात्र, डॉक्टर त्यापैकी केवळ एकाच बाळाचा जीव वाचवू शकले आहेत. रुग्णालयाच्या प्रवत्तäया डॉ. अनीजा जलील यांनी दिलेल्या माहितीनुसार, काही बाळांना मंगळवारी रात्री डिस्चार्ज देण्यात आला होता. त्यामुळे वॉर्डमधील बालकांच्या अचूक संख्येबाबत पडताळणी केली जात आहे.

### सोन्याचे दर 1 लाख 70 हजारांच्या जवळ पोहोचले!

नवी दिल्ली : सोन्याच्या किमतीत गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वाढ होत असल्याचं चित्र आहे. बाजारात सलग चार दिवसांपासून सोन्याच्या दरात वाढ नोंदवण्यात येत आहे. सराफा बाजारात मंगळवारी सोन्यातील तेजीचा चौथा दिवस राहिला. या दिवशी सोने २,७०० रुपयांच्या वाढीसह १,६७,१०० रुपये प्रति १० ग्रॅमच्या स्तरावर पोहोचले. बुधवारी सकाळी ६:३० वाजता सोन्या-चांदीचे दर खालीलप्रमाणे नोंदवले गेले, २४ कॅरेट सोने १,६३,४३० रुपये प्रति १० ग्रॅम आहे, तर २२ कॅरेट सोने १,४९,८११ रुपये प्रति १० ग्रॅमवर आहे.

# बसस्थानकात स्वच्छतेचा बोजवारा

## कचरा उचलण्याऐवजी परिसरातच ढीग; प्रवाशांचे आरोग्य धोक्यात

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अकोला:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) अकोला मध्यवर्ती बसस्थानकात सध्या 'दिव्याखाली अंधार' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रवाशांना स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या एसटी प्रशासनाच्याच नाकाखाली स्वच्छतेच्या नावाखाली कचऱ्याची विल्हेवाट लावण्याऐवजी परिसरातच त्याचे मोठमोठे ढीग साचवले जात आहेत. विशेष म्हणजे, ज्या स्वच्छता कर्मचाऱ्यांवर परिसराची जबाबदारी आहे, त्यांच्याकडूनच नियमांची उघडपणे पायमल्ली होत असल्याने प्रवाशांसह स्थानिक



नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. अकोला बसस्थानकातून दररोज हजारो प्रवासी राज्याच्या कानाकोपऱ्यात प्रवासासाठी येतात. त्यामुळे या परिसराचे आरोग्यदायी व स्वच्छ राहणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून बसस्थानक परिसराची साफसफाई केल्यानंतर जमा झालेला कचरा मुख्य कचरापेटीत किंवा घंटागाडीत न टाकता, बसस्थानकाच्या मोकळ्या जागेत आणि कोपऱ्यांमध्येच टाकून दिला जात आहे.साचलेल्या कचऱ्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून डास आणि माश्यांचा प्रादुर्भाव वाढला आहे. प्रवाशांना बसची वाट पाहत ताटकळत उभे राहताना रुमालाने नाक झाकून घ्यावे लागत आहे. उघड्यावरील कचऱ्यामुळे संसर्गजन्य आजार पसरण्याची भीती व्यक्त होत असून, लहान मुले व वृद्ध प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. एकीकडे स्वच्छता अभियानाचे मोठमोठे फलक लावून जनजागृती केली जाते, तर दुसरीकडे प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणा समोर येत आहे.

# अकोला शहरात ईद-ए-मिलादचा उत्साह !

## मिरवणुकीदरम्यान शांतता व शिस्त राखण्याचे आवाहन





मुफ्ती-ए-अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली अकोल्यात ऐतिहासिक जुलूस निघाला. मोठ्या संख्येत मुस्लीम बांधव जुलूस मध्ये सहभागी होते. शहरात जुलूस ज्या रस्त्याने निघाला त्या रस्त्यावर विविध ठिकाणी बिर्याणी वाटप, पाणी वाटप, शरबत वाटप करण्यात आले.

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अकोला:** आगामी धार्मिक मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित एका भव्य धार्मिक सभेत प्रमुख वत्तäयांनी नागरिकांना अत्यंत शिस्तबद्ध, मर्यादित आणि शांततापूर्ण मार्गाने सहभाग घेण्याचे जोरदार आवाहन केले आहे. मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक नागरिकाने आयोजक आणि 'जुलूस कमिटी'ने ठरवून दिलेल्या नियमांचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक असल्याचे मुफ्ती ए अकोला यांनी स्पष्ट केले.

मिरवणुकीदरम्यान झेंडे, ध्वज आणि इतर साहित्याचा वापर करताना विशेष काळजी घ्यावी, जेणेकरून कोणतीही अप्रिय घटना घडणार नाही आणि सुरक्षितता अबाधित राहील.तबर्रुकचे वाटप आणि ते स्वीकारताना पूर्ण आदराने व नम्रतेने वागावे. अन्नाचा अन् कष्टातून तयार केलेल्या प्रसादाचा कोणताही अवमान होणार नाही याची दक्षता घेण्याचे सांगण्यात आले. पोलिस ठाणे, मंदिरे आणि इतर धार्मिक स्थळांजवळून जाताना कोणत्याही प्रकारची घोषणाबाजी करू नये. अशा ठिकाणी न थांबता शांततेत पुढे जाण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. या मिरवणुकीचा उद्देश कोणालाही चिथावणी देणे किंवा हिणवणे हा नसून, हा एक अत्यंत धार्मिक व अध्यात्मिक सोहळा आहे. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन धार्मिक सौहार्द आणि शांतता जपणे गरजेचे आहे.

## CLASSIFIED

**प्रवेश देणे सुरू आहे**

आय.टी.आय. व १२ वी समकक्ष कोर्सेस

१) इलेक्ट्रीशियन २ वर्ष

(२) बांधकाम पर्यवेशक १ वर्ष प्रवेश

पात्रता : - १० वी, १२ वी पास /नापास, टक्कवारीची अट नाही डायरेक्ट ऑनलाईन प्रवेश.

संपर्क

स्नेहदीप व्होकेशनल ज्युनिअर कॉलेज, SBI बँकेच्या वरं, राठीनगर, अमरावती

मो. नं.- 8087958087

**शेती विकणे आहे**

मौजा चांदूर, ता.जि अकोला येथील शेत सर्व्हे नं. 188/2 आईच्या शाळेसमोर व प्रभात किड्सच्या मागील बाजूस, नगर पालिकेच्या बॉर्डरला लागून उत्तम लोकेशनचे आहे. लेआउटचे शेत 84 आर. लेआउटचे शेत विकणे आहे.

संपर्क : शरदचंद्र नेवास्कर

मो. नं.- 9822702276

# लालाजी' हायप्रोफाईल जुगार अड्डा धाबा की क्लब अनेकांना पडला प्रश्न

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अकोला:** पडद्यावर चटकदार मेजवानीचा 'धाबा', पण आतमध्ये मात्र लाखोंचा 'टेबल'! शहरात उघडपणे सुरू असलेल्या 'लालाजींच्या' या क्लबवर कारवाई करण्याचे धाडस यंत्रणा दाखवणार की अभयाची ही 'साखळी' अशीच सुरू राहणार, असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. पाचमोरी, अकोट फाईल नजीकच्या धाब्या आडून हा हायप्रोफाईल क्लब चालवला जात आहे. बाहेरून साधे भोजनगृह वाटणाऱ्या या वास्तूच्या गुप्त खोल्यांमध्ये दररोज लाखोंची उलाढाल होते. या 'सुरक्षित' अड्ड्यावर शहरातील नामांकित व्यावसायिक, बिल्डर्स आणि वजनदार लोकांची उठबस असते. रात्रीच्या अंधारात महागड्या गाड्यांच्या रांगा लागतात, तरीही स्थानिक प्रशासनाला याचा 'सुगावा' लागत नाही, यावर कुणाचा विश्वास बसेल?. क्लबचा खरा मालक कोण? कागदावर नाव कुणाचे आणि गल्ल्यावर कोण बसते? यावर नेहमीच मौन पाळले जाते. 'अशा अड्ड्यांवर धाड पडूच शकत नाही,' असा ठाम विश्वास लालाजींच्या वर्तुळात बोलून दाखवला जातो. तपास यंत्रणांना या क्लबाची इत्थंभूत माहिती असूनही कारवाई का टाळली जाते?.

# मुक्या प्राण्यांच्या पाठीवर 'काळ्या धंद्या'चे ओझे, म्हैसांगच्या रेती चोरीत गाढवांची पिळवणूक !

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अकोला :** माणसाची हाव आणि गुन्हेगारी प्रवृत्ती जेव्हा पराकाष्ठेला पोहोचते, तेव्हा त्याचा सगळ्यात मोठा फटका निसर्गासोबतच निरपराध प्राण्यांना बसतो. अकोला तालुक्यातील म्हैसांग परिसरात सध्या असाच एक हृदयद्रावक आणि तितकाच संतापजनक प्रकार समोर आला आहे. रेती उत्खनन बंद असताना नद्यांच्या पात्रातून रेतीचा अवैध उपसा करण्यासाठी रेती माफियांनी आता नव्या क्लृप्त्या लढवत असून, त्यांनी चक्क मुक्या गाढवांना या काळ्या धंद्यात लोटले आहे. म्हैसांग जवळील पुर्णा नदीपात्रातील कठीण, चिखलमय



आणि वाहने जाऊ न शकणाऱ्या अत्यंत अरुंद भागांतून रेती बाहेर काढणे माफियांच्या दृष्टीने अवघड बनले होते. शिवाय पोलिसांची आणि महसूल प्रशासनाची नजर चुकवणेही आवश्यक होते. यासाठी माफिया लोकांनी एक नवीन आणि क्रूर मार्ग शोधून काढला. भल्या पहाटे आणि रात्रीच्या अंधारात गाढवांच्या पाठीवर दोन्ही बाजूने जड पोती किंवा पाट्या बांधल्या जातात. नदीच्या पात्रातून ही रेती भरून गाढवांना चाबकाचे फटके मारत मुख्य रस्त्यापर्यंत चालवले जाते. तिथे उभ्या असलेल्या ट्रॅक्टरमध्ये ही रेती रिकामी केली जाते. दिवसभरात एका गाढवाच्या पाठीवर त्याच्या क्षमतेपेक्षा कित्येक पटीने जास्त वजनाचे ओझे लादले जाते. भुकेने व्याकुळ आणि थकलेल्या या प्राण्यांचा ओरडण्याचा आवाजही नदीच्या पात्रात विरून जातो. प्रशासनाची नजर चुकवण्यासाठी प्राण्यांचा असा अमानुष बळी दिला जात असल्याने पर्यावरणप्रेमी आणि प्राणीमित्रांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# रोहित पवार काँग्रेसमध्ये जाण्याची जोरदार चर्चा!



प्रतिनिधी २६ ऑगस्ट

पुणे : राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांची गेल्या काही काळापासूनची काँग्रेस नेत्यांसोबतची जवळीक वाढल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहेत. त्यामुळे रोहित पवार काँग्रेसमध्ये जाणार आहेत का, अशा उलटसुलट चर्चा रंगू लागल्या आहेत. दिल्लीत रोहित पवारांनी राहुल गांधींची घेतलेली भेट घेतल्यानंतर चर्चा आणखी जोर धरु लागल्या. रोहित पवार यांच्या वारंवार राहुल गांधींच्या समर्थनातील वक्तव्यांमुळे रोहित पवार काँग्रेसमध्ये जाणार असल्याचा आरोप अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील नेत्यांनीही केला होता. दरम्यान याबाबत आम्ही रोहित पवारांना विचारल्यानंतर त्यांनी मात्र या चर्चांचं खंडन केले.

# 'नीट' प्रकरणी ३१ ऑगस्टपर्यंत तपासणी!

## 1 सप्टेंबरला दोषारोप निश्चितीबाबत निर्णय, पेपरफुटीबाबत 250 पुरावे

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**नाशिक :** 'नीट-यूजी' पेपरफुटी प्रकरणात तेरा संशयितांविरुद्ध दाखल खटला आता महत्त्वपूर्ण वळणावर आला आहे. दोषारोप निश्चितीबाबत १ सप्टेंबर रोजी दिल्ली न्यायालयात महत्त्वाची सुनावणी होणार आहे. तत्पूर्वी 'सीबीआय'ने दोषारोपपत्रात समाविष्ट न केलेल्या तब्बल अडीचशे कागदपत्रांसह इतर पुराव्यांची तपासणी करण्याची परवानगी न्यायालयाने सर्व संशयितांच्या वकिलांना दिली आहे. यापूर्वीच सर्व वकिलांना दोषारोपपत्राची प्रत 'पेन ड्राइव्ह'मधून देण्यात आली असून, १३ ही संशयित




सध्या न्यायालयीन कोठडीनुसार कारागृहात आहेत.

दरम्यान, 'सीबीआय'च्या वकिलांनी नव्या 'सार्वजनिक परीक्षा (पेपरफुटी प्रतिबंधक) कायद्यान्वये' कलम '१२ अ'चा उल्लेख करून या प्रकरणाची सुनावणी नियमित घेत 'फास्ट ट्रॅक'वर खटला चालवण्याची मागणी केली. सीबीआयने तपासादरम्यान संशयितांकडून आणि इतर ठिकाणांहून अडीचशेपेक्षा जास्त कागदपत्रे व पुरावे संकलित केले आहेत. मात्र, गुन्हा सिद्ध करण्यासाठी ज्या पुराव्यांची गरज असते, त्यांचाच समावेश दोषारोपपत्रात केला जातो. त्यानुसार संबंधित अडीचशे कागदपत्रांसह पुरावे दोषारोपपत्रात नाहीत. त्यामुळे संशयितांच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचा दाखला देत बचावाची बाजू मांडण्यासाठी 'सीबीआय'ने जप्त केलेल्या सर्व कागदपत्रांची पाहणी करण्याचा अधिकार असल्याचे सांगितले. न्यायालयाने कायदेशीर हक्कांचा विचार करून संबंधित मागणी मान्य केली. 'सीबीआय'ने विषयतज्ज्ञांच्या मदतीने मोबाइलमधील 'व्हॉट्सअॅप चॅटिंग' आणि 'डिलिट' केलेल्या डेटाचे सायबर विश्लेषण केले आहे.

### दोषारोपपत्र दाखल केलेले १३ संशयित

नीट-यूजी २०२६ पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) दिल्ली येथील राऊस अव्हेन्यू कोर्टात दोषारोपपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये प्रा. मनीषा गुरुनाथ मांढरे, प्रल्हाद विठ्ठलराव कुलकर्णी, मनीषा संजय हवालदार या तीन प्राध्यापकांसह खासगी क्लासेसचे संचालक तेजस हर्षदकुमार शाह, शिवराज रघुनाथ मोटेगावकर, मध्यस्थ डॉ. मनोज भगवानराव शिरुरे, मनीषा संजय वाघमारे, धनंजय निवृत्ती लोखंडे, शुभम मधुकर खैरनार, यश यादव, मांगीलाल बिवाल ऊर्फ मांगीलाल खातीक, दिनेश बिवाल आणि विकास बिवाल या संशयितांचा समावेश आहे.

# वसतिगृह प्रवेशासाठीची 30 वर्षांची वयोमर्यादा रद्द!

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

मुंबई : मुंबई शासकीय आदिवासी वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी लागू केलेली ३० वर्षांची कमाल वयोमर्यादा अखेर रद्द करण्यात आली आहे. आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी मंगळवारी आदिवासी आमदारांसोबत बैठक घेतल्यानंतर हा निर्णय जाहीर केला. सर्वपक्षीय आदिवासी आमदारांच्या सूचनांचा विचार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेने वयोमर्यादेचा नियम रद्द करण्यात आला आहे, असं उईके यांनी सांगितलं आहे.



# महिलांना मतदानाचा घटनात्मक अधिकार देणारा दिवस

## आज महिला समानता दिन



अमेरिकेच्या घटनेतील १९ व्या घटनादुरुस्तीच्या ९६ व्या वर्धापन दिनानिमित्त नॅन्सी पेलोसी , ॲना एशू , बार्बरा ली आणि जॅकी स्पीअर, ज्याद्वारे महिलांना मतदानाचा हक्क मिळाला.
अमेरिकेत २६ ऑगस्ट रोजी महिला समानता दिन साजरा केला जातो. १९२० मध्ये अमेरिकेच्या संविधानात स्वीकारलेल्या एकोणिसाव्या घटनादुरुस्तीच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. ही घटनादुरुस्ती राज्य सरकार आणि संघीय सरकारला लिंगाच्या आधारावर अमेरिकेच्या नागरिकांना मतदानाचा हक्क नाकारण्यास प्रतिबंध करते. हा दिवस सर्वप्रथम १९७१ मध्ये साजरा करण्यात आला, १९७३ मध्ये काँग्रेसने तो निश्चित केला आणि दरवर्षी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष तो घोषित करतात.
आज स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. पुरुषांच्या बरोबरीने आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात वावरत आहेत. त्यामुळे महिलांना समान हक्क आणि अधिकार मिळावेत, याच उद्देशाने जगभरात दरवर्षी २६ ऑगस्ट ह दिवस महिला समानता दिन म्हणून साजरा केला जातो. पुरुष आणि महिला एकाच घराचे दोन खांब आहेत. एक खांब जरी डगमगला तरी घराचा तोल जाऊ शकतो. त्यामुळे दोन्ही खांब मजबूत आणि समान असायला हवेत. भारतात पूर्वीपासून पुरुषप्रधान संस्कृती होती. त्यामुळे महिलांना आपल्या हक्क आणि अधिकारांसाठी सातत्याने लढावे लागले. आज स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. पुरुषांच्या बरोबरीने आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात वावरत आहेत. त्यामुळे महिलांना समान हक्क आणि अधिकार मिळावेत, याच उद्देशाने जगभरात दरवर्षी २६ ऑगस्ट हा दिवस महिला समानता दिन म्हणून साजरा केला जातो.
१९२० मध्ये परराष्ट्र सचिव बेनब्रिज कोल्बी यांनी अमेरिकन महिलांना मतदानाचा घटनात्मक अधिकार देणार्‍या जाहीरनाम्यावर स्वाक्षरी केली त्या दिवसाच्या स्मरणार्थ ही तारीख निवडण्यात आली. १९७१ मध्ये, १९७० च्या समानतेसाठीच्या देशव्यापी महिलांच्या संपानंतर आणि पुन्हा १९७३ मध्ये, समान हक्क दुरुस्तीवरील लढाया सुरू असताना, न्यूयॉर्कच्या काँग्रेसवुमन बेला अबझुग यांनी २६ ऑगस्ट हा महिला समानता दिन म्हणून घोषित करण्यासाठी एक ठराव मांडला. १९७२ मध्ये, राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी घोषणापत्र ४१४७ जारी केले, ज्यामध्ये २६ ऑगस्ट, १९७२ हा 'महिला हक्क दिन' म्हणून घोषित करण्यात आला आणि हे महिला समानता दिनाचे पहिले अधिकृत घोषणापत्र होते. १६ ऑगस्ट, १९७३ रोजी, काँग्रेसने एचजे रेस. ५२ मंजूर केले, ज्यामध्ये असे म्हटले होते की २६ ऑगस्ट हा महिला समानता दिन म्हणून घोषित केला जाईल आणि '१९२० मधील त्या दिवसाच्या स्मरणार्थ राष्ट्राध्यक्षांना घोषणापत्र जारी करण्याचा अधिकार आणि विनंती करण्यात आली आहे, ज्या दिवशी अमेरिकेतील महिलांना मतदानाचा हक्क प्रथमच देण्यात आला होता'. त्याच दिवशी, राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी महिला समानता दिनासाठी घोषणापत्र ४२३६ जारी केले, ज्याची सुरुवात अंशतः अशी होती: 'महिलांच्या मतदानाच्या हक्कासाठीचा संघर्ष हा, तथापि, आपल्या राष्ट्राच्या जीवनात महिलांच्या पूर्ण आणि समान सहभागाच्या दिशेने केवळ पहिले पाऊल होते. अलिकडच्या वर्षांत, आपण आपल्या कायद्यांद्वारे लैंगिक भेदभावावर हल्ला करून आणि महिलांसाठी समान आर्थिक संधीचे नवीन मार्ग मोकळे करून इतर मोठी प्रगती केली आहे. आज, आपल्या समाजाच्या जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात, महिला अमेरिकन जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. आणि तरीही, अजून बरेच काही करणे बाकी आहे'.
१९८१ मध्ये, २१ महिलांनी पांढरे कपडे परिधान केले आणि समान हक्क दुरुस्तीच्या मंजुरीची मागणी करण्यासाठी स्वतःला व्हाईट हाऊसला साखळ्यांनी बांधले . २०२४ पर्यंतरिचर्ड निक्सन यांच्यापासून प्रत्येक राष्ट्राध्यक्षाने दरवर्षी २६ ऑगस्ट हा महिला समानता दिन म्हणून घोषित करणारा जाहीरनामा जारी केला आहे. गो टॉपलेस डे , २००७ मध्ये सुरू झालेला एक वार्षिक कार्यक्रम, महिला समानता दिनाच्या सर्वात जवळच्या रविवारी आयोजित केला जातो, कारण 'सिल्वी शाबोट यांच्या विधानानुसार २६ ऑगस्ट हा अमेरिकेत महिला समानता दिन आहे कारण २६ ऑगस्ट १९२० रोजी महिलांना मतदानाचा घटनात्मक अधिकार मिळाला होता.'

# देशात साखरेचा 'गोड' तुटवडा की सट्टेबाजीचा 'कडू' खेळ?



**साखरेची आकडेवारी काय सांगते?**
आपल्या देशाचा वार्षिक साखरेचा एकूण खप सुमारे २८० ते २८५ लाख टन आहे. या हंगामाच्या सुरुवातीला आपल्याकडे तब्बल १५० लाख टन साखरेचा शिल्लक साठा उपलब्ध होता. सप्टेंबरअखेर सर्व गरजा भागवून देशाकडे तब्बल ३५ लाख टन साखरेचा अतिरिक्त साठा सुरक्षित राहणार आहे. या अधिकृत आकडेवारीवरून स्पष्ट होते की, देशात साखरेचे उत्पादन आणि साठा पुरेसा आहे. त्यामुळे इथेनॉल निर्मितीमुळे साखरेचा तुटवडा झाला हा दावा पूर्णपणे फेटाळण्याजोगा आहे. नागरिकांनी हे समजून घेणे गरजेचे आहे की, बाजारातील ही दरवाढ नैसर्गिक नसून केवळ साठेबाजांनी आणि सट्टेबाजांनी निर्माण केलेला एक फुगा आहे. की यासाठी पण सरकारच जबाबदार आहे? तर नागरिकांनी अफवांना बळी न पडता, भीतीपोटी अतिरिक्त खरेदी करणे टाळले पाहिजे. तसेच प्रशासनानेही तातडीने हस्तक्षेप करून साठेबाजांवर कठोर कारवाई करण्याची आणि बाजारातील साखरेचा पुरवठा सुरळीत करण्याची गरज आहे, जेणेकरून सामान्य माणसाच्या डोळ्यात आटलेला अश्रू पुन्हा 'गोड' होईल.

महागाईच्या झळा सोसणाऱ्या सर्वसामान्य जनतेच्या ताटात आता साखरेच्या दरवाढीने आणखी एक कडू घोट ओतला आहे. दैनंदिन वस्तूंचे भाव गगनाला भिडलेले असतानाच, बाजारात साखरेचा अचानक कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या बातम्या, इथेनॉल निर्मितीसाठी ऊस पळवल्याचे आरोप आणि सरकारवर होणारी टीका... या सगळ्याच्या गर्तेत सामान्य नागरिक मात्र पुरता गोंधळात पडला आहे. 'पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळून आणि दुसरीकडे साखरेचे भाव वाढवून सामान्य माणसाचा खिसा कापायचा हा नवा फंडा आहे का?' असा उद्विग्न सवाल आज प्रत्येक गृहिणी आणि सामान्य नागरिक विचारत आहे. पण, या संपूर्ण गोंधळामागील खरं सत्य काय आहे? हा खरोखरच साखरेचा तुटवडा आहे की बाजारातील 'सट्टेबाजी'चा बनाव?
इंडियन शुगर मिल असोसिएशन (ISMA) चे अध्यक्ष नीरज शिरगावकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, देशात साखरेचा कोणताही वास्तविक तुटवडा नाही. बाजारात सध्या सुरू असलेला हा खेळ केवळ 'सट्टेबाजी' आणि भीतीपोटी झालेल्या साठेबाजीचा परिणाम आहे. बाजारात तुटवडा निर्माण होणार अशा अफवा पसरवून घाऊक व्यापाऱ्यांनी दीड ते दोन महिन्यांचा साठा आगाऊ खरेदी करून गोदामांमध्ये डांबून ठेवला. यामुळे बाजारात 'बनावट टंचाई' निर्माण झाली आणि साखरेचे भाव गगनाला भिडले.

**प्रा. प्रज्ञानंद थोरात**
मो. 9822674487

# जिवंत माणसांना वेळ द्या..!



ज्या दिवशी अंत्ययात्रा निघाली... चार मित्रांपैकी फक्त तीनच जण पोहोचले...

कॉलेजच्या त्या जुन्या इमारतीच्या पायर्‍यांवर बसून चार मित्रांनी एकदा आयुष्यभर लक्षात राहील असा शब्द दिला होता. आरव... कबीर... नील... आणि मानव... चौघेही अगदी जिवाभावाचे. एकाचा आनंद म्हणजे चौघांचा आनंद... एकाचे दुःख म्हणजे चौघांचे दुःख. त्या दिवशी कॅन्टीनमध्ये चहा पिताना मानव अचानक हसत म्हणाला, 'अरे... आपण एक वचन देऊ या?' सगळे हसले. 'ज्याचा मृत्यू आधी होईल... त्याच्या अंत्ययात्रेला उरलेले तिघे खांदा देतील.' क्षणभर शांतता पसरली... आणि मग चौघेही खळखळून हसू लागले. 'वेडा आहेस तू!' चारही हात एकमेकांवर ठेवले गेले. 'प्रॉमिस!' त्यांना वाटलं होतं... मृत्यू अजून खूप दूर आहे. पण आयुष्याला भविष्य सांगायला कधीच जमत नाही...

कॉलेज संपलं... स्वप्नं मोठी झाली... रस्ते वेगळे झाले... आरव परदेशात गेला. कबीर स्वतःचा व्यवसाय उभारण्यात गुंतला. नील सरकारी नोकरीत रुजू झाला आणि मानव... तो मात्र गावातच राहिला. वृद्ध, आजारी वडिलांचं छोटंसं दुकान सांभाळण्यासाठी त्याने स्वतःची अनेक स्वप्नं शांतपणे बाजूला ठेवली. सुरुवातीला... दररोज फोन व्हायचे. रात्री तासनतास गप्पा. नंतर आठवड्यातून एकदा. मग महिन्यातून एकदा. आणि मग... 'भेटू या रे...' 'नक्की...' 'पुढच्या महिन्यात...' हे शब्द कायमचे अपूर्ण राहिले. सोशल मीडियावर वाढदिवसाच्या शुभेच्छा... स्टेटसवर ??... एखादं 'टेक केअर'.. इतकीच मैत्री उरली.

एका रात्री... साडेअकरा वाजले होते. जुन्या व्हॉट्स ॲप ग्रुपवर एक मेसेज आला. 'मित्रांनो... मानव आपल्यात नाही.' बस... फक्त एवढंच. कबीरने लगेच लिहिलं... ' अशी चेष्टा करू नका...' नीलने फोन लावला. फोन दुसर्‍याने उचलला. तिकडून थरथरणारा आवाज आला... 'दादा... सकाळी दहा वाजता अंत्ययात्रा आहे... शक्य असेल तर... नक्की या...' फोन कट झाला. तिघांपैकी एकाही मित्राला त्या रात्री झोप लागली नाही. दुसर्‍या दिवशी... पांढर्‍या चादरीत शांत झोपलेला मानव त्यांच्या समोर होता. चेहरा तोच... हसू तेच... पण डोळे... कायमचे मिटलेले. आरवने थरथरत्या हाताने त्याच्या कपाळाला स्पर्श केला. गार... पूर्ण गार... आणि त्याच्या तोंडून नकळत शब्द बाहेर पडले... 'अरे उठ ना रे... आपण अजून भेटायचं होतं...' उत्तर आलंच नाही.

तेवढ्यात मानवाचे वृद्ध वडील हळूहळू पुढे आले. त्यांच्या डोळ्यांत अश्रू नव्हते. कारण... सगळे अश्रू आधीच संपले होते. त्यांच्या हातात एक छोटासा लोखंडी डबा होता. ते म्हणाले... 'हा... तो तुमच्यासाठी ठेवून गेला होता...' डबा उघडला. आत चार पाकिटं होती. तीन मित्रांच्या नावाची... आणि चौथं... 'मानव' स्वतःच्या नावाचं. क्षणभर कुणीच काही बोललं नाही. सगळ्यांनी आपापलं पत्र उघडलं.त्यात लिहिलं होतं... 'जर तुम्ही हे वाचत असाल... तर मी माझा शब्द पाळला आहे. आता तुमची वेळ आहे. पण... माझ्या अर्थीला खांदा देण्यापूर्वी... एक काम करा.' तिघांचे हात थरथरू लागले. पुढे लिहिलं होतं... 'तुमच्या मोबाईलची गॅलरी उघडा... पाहा... गेल्या तीन वर्षांत... आपला एक तरी नवीन फोटो आहे का?' तिघांनी फोन उघडले. हजारो फोटो. नवीन गाडी. परदेश. ऑफिस. व्यवसाय. मुलं. सुट्ट्या. समारंभ. सगळं होतं. पण... चार मित्रांचा शेवटचा फोटो... पाच वर्षांपूर्वीचा. कॉलेज री-युनियनचा. सगळे हसत होते. कोणालाच कल्पना नव्हती... तोच शेवटचा फोटो ठरेल. पत्र पुढे म्हणत होतं... 'तुम्ही मला कधीच विसरलात नाही... फक्त... भेटणं पुढे ढकलत राहिलात. मीही म्हणत राहिलो... 'काही हरकत नाही... पुढच्या वेळी भेटू.' पण... आयुष्याने 'पुढची वेळ'च दिली नाही.' या एका ओळीने... तिघेही कोसळले. ढसाढसा रडू लागले. स्मशानभूमीत प्रत्येकाच्या रडण्याचा आवाज घुमत होता. पण... पत्र अजून संपलं नव्हतं. शेवटी लिहिलं होतं... 'माझी शेवटची इच्छा... माझ्यावर अग्नी देण्यापूर्वी... माझ्यासोबत एक सेल्फी काढा. ती सोशल मीडियावर कधीच टाकू नका. जेव्हा काम... पैसा... जबाबदार्‍या... तुम्हाला तुमच्या माणसांपासून दूर नेतील... तेव्हा फक्त तो फोटो पाहा. आणि स्वतःला विचारा... जिवंत माणसांसाठी वेळ नव्हता... मग मृत माणसासाठी एवढे अश्रू कशाला?'

त्या दिवशी... स्मशानभूमीत... तीन मित्र... एका अर्थीजवळ उभे राहिले. कोणीच हसत नव्हतं. डोळे सुजलेले. हात थरथरत होते. मोबाईलचा कॅमेरा सुरू झाला. एक फोटो काढला गेला. आणि त्या एका फोटोमध्ये... संपूर्ण आयुष्याचं सत्य बंदिस्त झालं. सहा महिन्यांनंतर... प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी... ते तिघे न चुकता भेटू लागले. फोन सायलेंट. काम बंद. व्यवसाय बंद. कारण त्यांना समजलं होतं... व्यस्त असणं ही यशाची खूण असू शकते... पण आपल्या माणसांसाठी वेळ नसणं हे आयुष्याचं सर्वात मोठं अपयश असतं. माणूस मित्राच्या मृत्यूने तितका रडत नाही... जितका तो त्या न भेटलेल्या क्षणांसाठी रडतो... त्या पुढे ढकललेल्या भेटीसाठी रडतो... त्या एका फोनसाठी रडतो... जो 'उद्या करतो...' म्हणत कधीच केला गेला नाही. लक्षात ठेवा... मृत्यू अचानक येतो... पण... 'एकदा भेटायला हवं होतं...' हा पश्चात्ताप आयुष्यभर जिवंत राहतो. आजच एखाद्या जुन्या मित्राला फोन करा. कारण... काही नाती पुन्हा जुळतात... पण काही माणसं... फक्त आठवणीतच उरतात. जिवंत माणसांना वेळ द्या... कारण अंत्ययात्रेला पोहोचणं सोपं असतं... पण त्याआधी एकदा भेटणं, हीच खरी मैत्री असते.

# हिंदु धार्मिक प्रतीक 'स्वस्तिक'साठी विदेशात चालू असलेला संघर्ष : कहाणी आणि बोध !

आठवड्यात अमेरिकेच्या न्यू जर्सीतील १५ वर्षांची मीरा त्रिवेदी हिने युक्तीवाद आणि पाठपुरावा केल्याने शाळा मंडळांनी त्यांच्या नियमावलीत पालट केला. 'स्वस्तिक हे द्वेषाचे प्रतीक नाही', हे मान्य करत त्यावरील बंदी हटवली. मीराने शालेय गणवेश नियमावलीही अद्ययावत् करून घेतली. देशातील स्वस्तिक पूजकांना याची कितपत माहिती झाली आहे आणि ज्यांना झाली, त्यांना ती किती महत्त्वाची वाटली, याची कल्पना नाही. तरी एक स्वस्तिक पूजक आणि साधक म्हणून स्वस्तिकासाठी विदेशात चालू असलेल्या संघर्षाची कहाणी मला महत्त्वाची वाटते. म्हणून हा लेखनप्रपंच...

**हिंदूंचे धार्मिक चिन्ह 'स्वस्तिक' आणि हिटलरच्या नाझी पक्षाचे चिन्ह 'हॅकेनक्रूझ'**

**१. कालावधी संघर्षाचा**

गेल्या एका वर्षात विदेशातील हिंदूंच्या प्रयत्नांमुळे तेथील सरकारे आणि शाळा प्रशासन यांना 'धार्मिक स्वस्तिक' अन् नाझी 'हाकेनक्रूझ' यांमधील भेद कायद्याने, तसेच लेखी स्वरूपात स्पष्टपणे मान्य करणे भाग पडले आहे. यामुळे या धार्मिक चिन्हावर बंदी घालणे किंवा त्याला गुन्हेगारी स्वरूपाचे ठरवणे, हे रोखण्यात चांगले यश आले आहे. स्वस्तिकसंबंधीच्या संघर्षाचा कालावधी तसे पहाता १० वर्षांचा आहे. त्याचा डोळसपणे अभ्यास केल्यास पुष्कळ काही शिकता येईल.

**'हाकेनक्रूझ' आणि 'स्वस्तिक' यांतील भेद**

विदेशात स्वस्तिकसाठी संघर्ष का आणि कसा करावा लागला, हे समजून घेण्यासाठी प्रथम 'हाकेनक्रूझ' आणि 'स्वस्तिक' यांतील भेद समजून घेणे अनिवार्य आहे. (या लेखात दिलेली दोन्ही छायाचित्रे पहावीत.)

**३. हाकेनक्रूझचा इतिहास**

१९२० च्या दशकात जर्मनीच्या ॲडॉल्फ हिटलरने नाझी पक्षासाठी 'हाकेनक्रूझ' या चिन्हाची निवड केली. नाझींच्या ज्यू द्वेषाचे ते प्रतीक कसे बनले, हे सर्वज्ञात आहे. दुसर्‍या महायुद्धात नाझींच्या पराभवानंतर पाश्चिमात्य देशांमध्ये नाझी चिन्हांवर कडक बंदी घालण्यात आली. हाकेनक्रूझ क्रौर्य, अमानवीयता आणि द्वेष यांचे प्रतीक बनले.

**४. पाश्चिमात्य देशांत 'स्वस्तिक' द्वेषाचे प्रतीक कसे बनले ?**

हिटलरने त्याच्या 'माइन काम्फ' या पुस्तकात कुठेही 'स्वस्तिक' असा शब्द वापरला नव्हता. १९३० च्या दशकात 'माइन काम्फ'च्या पहिल्या इंग्रजी भाषांतरांमध्ये नाझी चिन्हाचा इंग्रजी भाषेत अनुवाद केला गेला. त्यात 'Hakenkreuz' (हाकेनक्रूझ) या जर्मन शब्दाचे भाषांतर 'Hooked Cross' (हुक्ड क्रॉस) असे न करता 'स्वस्तिक' असे करण्यात आले. मग तेथील कायदे आणि शब्दकोश यांमध्ये 'नाझी चिन्ह = स्वस्तिक' अशी नोंद झाली. परिणामी हिंदु, बौद्ध आणि जैन या समुदायांच्या पवित्र धार्मिक प्रतीकाकडे पाश्चिमात्य देशांत द्वेषाचे चिन्ह म्हणून पाहिले जाऊ लागले. तेथे स्वस्तिक वापरासंबंधीच्या समस्या या समुदायांसाठी जटील बनल्या. हे प्रतीक वापरणार्‍यांविषयी पाश्चात्त्य देशांत प्रतिक्रिया निर्माण झाल्या.

**५. भारतीय आणि आशियाई वंशाच्या मंडळींना बसलेला फटका**

२० व्या शतकाच्या मध्यानंतर पाश्चिमात्य देशांमध्ये भारतीय आणि आशियाई वंशाची लोकसंख्या वाढू लागली. या समस्येचा फटका या मंडळींना बसू लागला. सणांच्या वेळी (उदाहरणार्थ दिवाळी) घराबाहेर किंवा मंदिरांवर स्वस्तिक काढल्यास पोलीस तक्रार होणे, नोकरीवरून काढणे किंवा सार्वजनिक अपमान हे वाट्याला येऊ लागले.

**६. 'हिंदु-ज्यू लीडरशिप समिट'मध्ये 'स्वस्तिक'ला मान्यता**

वर्ष २००८ मधील ऐतिहासिक 'हिंदु-ज्यू लीडरशिप समिट'मध्ये ज्यू धर्मगुरूंनी 'स्वस्तिक'च्या प्राचीन धार्मिक आणि पवित्र उत्पत्तीला उघडपणे मान्यता दिली. हा या संघर्षातील हा पहिला मोठा औपचारिक विजय. नाझी आणि ज्यू यांच्यातील संबंधांचा तपशील ठाऊक असलेल्यांना असे का ?, हे सहज लक्षात येईल. अर्थात् याचा लाभ पाश्चिमात्य देशांतील स्वस्तिक पूजकांना प्रत्यक्ष जीवनात अगदी मर्यादितच झाला. याचे कारण ही मान्यता पाठ्यपुस्तके, द्वेषविरोधी कायदे किंवा शालेय धोरणांपर्यंत पोचली नाही. शिखर परिषदेत मान्य सूत्राचा व्यावहारिक जीवनात लाभ घेण्यास येथे हिंदू अल्प पडले होते, असे म्हणावे लागते.

**७. १० वर्षांपूर्वीपर्यंत 'स्वस्तिक' वापराविषयी भीती**

१० वर्षांपूर्वी भारताबाहेर स्वस्तिक समर्थकांकडे राजकीय प्रभाव किंवा अन्य प्रकारची शक्ती जवळजवळ शून्य होती. त्यामुळे स्वस्तिक वापराविषयी कुणी छळले गेल्यासच फारतर केवळ बचावात्मक प्रतिक्रिया दिली जायची. पाश्चात्त्य प्रसारमाध्यमे, शिक्षणक्षेत्र किंवा सरकार यांमध्ये याविषयी कोणतीही संस्थात्मक जागरूकता नव्हती. सार्वजनिक चर्चेत 'हाकेनक्रूझ' हा शब्द पूर्णपणे अनोळखी होता. नाझी समर्थक म्हणून शिक्का मारला जाण्याच्या भीतीने हे स्वस्तिक पूजकांना ते पूर्णपणे लपवावे लागले. मंदिरांमध्ये स्वस्तिक केवळ आतील भागात असे. घराच्या उंबरठ्यावर किंवा वाहनांवर लावणे टाळले जात असे.

**८.'झिरो टॉलरन्स' (शून्य सहिष्णुता) धोरणाचा फटका**

गेल्या ५-६ वर्षांत द्वेषयुक्त चिन्हांविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण लागू करत पाश्चात्त्य सरकारांनी नाझी चिन्हांवर पूर्ण बंदी घालण्याचे अधिक कडक कायदे करणारे प्रस्ताव मांडण्यास प्रारंभ केला. तथापि कायदेकर्त्यांनी मसुद्यांत 'नाझी स्वस्तिक' शब्दाचा वापर केला. प्राचीन स्वस्तिक वापरणार्‍यांवर सरळ सरळ गुन्हेगारीचा शिक्का बसण्याचा, तसेच कडक शिक्षा होण्याचा धोका निर्माण झाला. याला हिंदूंनी विरोध चालू केला. हा संघर्ष अद्याप पूर्ण झालेला नाही; मात्र तो यशस्वी होत आहे. त्यामुळे संघर्षासंबंधी समजून घेण्याच्या आधी त्यातील मुख्य अडथळे समजून घ्यायला हवेत.

**९. अद्वितीय धार्मिक संघर्ष**

पाश्चिमात्य देशांमध्ये ख्रिस्ती वगळता इतर धर्मियांना काही ना काही संघर्ष करावा लागत असतो आणि लागलेला आहे; मात्र हिंदूंना 'स्वस्तिक'साठी करावा लागणारा संघर्ष त्यांच्यापेक्षा आगळा आहे.

अ. बहुतेक अन्य धर्मांसाठी पाश्चिमात्य देशांमध्ये त्यांच्या त्यांच्या धर्मचरणासंबंधी मान्यता अथवा समावेशकता (उदा. हिजाब परिधान करण्याचा अधिकार मिळणे) मिळावी, हा संघर्ष असतो. त्यांनी संबंधित कृती केली, तरी त्यांना येथे या धर्मियांना गुन्हेगार ठरवले जाणार नाही.

आ. 'स्वस्तिक'चा वापर करणे, म्हणजे द्वेषाला खतपाणी घालणारा गुन्हा ठरवला जाणे', असे आहे. हिंदूंचा संघर्ष अशा प्रकारचा आहे.

इ. भाषिक करामतीमुळे 'नाझी चिन्ह' असा शिक्का स्वस्तिकवर मारला जात आहे. मग 'स्वस्तिक हे द्वेषाचे प्रतीक नाही, ते वेगळे आणि पवित्र आहे', हे सिद्ध करण्याचे दायित्व हिंदूंवर आहे.

ई. 'क्रॉसचे चिन्ह' गळ्यात बाळगले, तर तेथे हा व्यक्ती धार्मिक आहे', असे म्हटले जाईल; परंतु 'स्वस्तिक' बाळगले, तर 'हा व्यक्ती धार्मिक नव्हे, तर द्वेषाला खतपाणी घालणारा आहे', हे लगेच मानले जाईल. मग त्या व्यक्तीला स्वत:चा बचाव सिद्ध करावा लागेल.

**डॉ. दुर्गेश सामंत**, गोवा

# प्रेषित मुहम्मद (सं.) चा अंतिम संदेश

संपूर्ण जगाच्या कानाकोप-यात इस्लाम धर्माचा प्रसार कसा झाला याचे रहस्य म्हणजे प्रेषित मुहम्मद (स) चा अंतिम संदेश आणि त्यानुसार त्यांच्या सहाबांनी (अनुयांनी) केलेली अंमलबजावणी होय. सउदी अरेबियात मक्का नावाच शहर आहे. त्या ठिकाणी अराफात नावाचे मोठे मैदान आहे. त्या मैदानात जवळपास एक लाख पंचविस हजार सहाबा जमलेले आहेत. प्रेषित त्यांना आपल्या जिवन काळातील शेवटचा संदेश देत आहे. सर्व स्तूती अल्लाहची असो आम्ही त्याचाच गौरव करतो आणि त्याच्या सहाय्याची व क्षमेची याचना करतो आणि आम्ही त्यांच्या सन्मुखी होतो. आम्ही स्वतःतील वाईट गोष्टीपासून अल्लाहचा आश्रय घेतो. ज्याला अल्लाह योग्य मार्गावर नेतो त्याला मार्गभ्रष्ट करणारा कोणी नाही आणि ज्याला अल्लाह मार्गभ्रष्टेत टाकतो त्याला योग्य मार्गावर आणणारा कोणी नाही, मी ग्वाही देतो की, अन्य कोणीही इश्वर नसून केवळ अल्लाहच आहे. त्याचा कोणीही सहभागी अगर वाटेकरी नाही. आणि मी अशीही ग्वाही देतो की मुहम्मद त्याचे दास आणि त्याचे प्रेषित आहेत. मी तुम्हाला ताकीद देतो हे अल्लाहचे दासांनो तुम्ही अल्लाहचे भय बाळगा. त्याचे आशापालन करा. असा मी आग्रह करतो आणि जे सत्य आहे चांगले आहे त्याच्यासह मी माझ्या भाषणाचा आरंभ करतो.

तुम्ही लोकांनो माझे शब्द लक्षपूर्वक ऐका मी तुम्हाला संदेश देत आहे. कारण या वर्षानंतर मी तुमच्या मध्ये पुन्हा असेन की नाही, हे मला ठाउक नाही. हे लोकहो तुम्ही तुमच्या स्वामी समक्ष हजर होण्याच्या काळापर्यंत तुमचे रक्त तुमची मालमत्ता आणि तुमची आब्रु पवित्र आहे आणि अभंग आहे. आजच्या दिवसा इतके आणि महिन्या इतकेच ते सर्वासाठी पवित्र आहे. खचितपणे तुमच्या स्वामीला तुम्ही भेटाल आणि तुमच्या कृत्याबद्दल तुम्ही उत्तरदायी असाल मी तुम्हाला संदेश पोहचविला आहे नाही काय ? हे अल्लाह तु साक्ष रहा.

ज्याकडे कोणाकडे विश्वस्त म्हणून काही ठेवलेले असेल ते त्याचे ठेवीदाराला परत करावे. सावध रहा जो अपराध करील त्याच्या खेरीज अन्य कोणावरही त्या अपराधाची जबाबदारी नाही. पित्याच्या अपराधासाठी त्याचा मुलगा जबाबदार नाही. तसेच मुलाच्या गुन्ह्यासाठी त्याचा बाप जबाबदार नाही. हे लोकांनो माझे शब्द नीट ऐका आणि नीट समजून घ्या. अज्ञान काळातील रक्ताचा सूड उगविण्याचे दिवस आता क्षमा करून सूट दिली गेली आहे. रक्ताचा बदला घेण्याच्या पहिल्या प्रकरणात मी सुट देउन तो हक्क संपवितो. व्याज घेण्याची सक्त मनाई आहे. परंतु तुमचा मुद्दल वसूल करण्याचा तुम्हाला अधिकार आहे. तुम्ही कोणावर अन्याय करू नका. तुमच्यावरही अन्याय केला जाणार नाही.

हे लोकांनो पत्नीच्या संदर्भात अल्लाहचे भय बाळगा. खचितच अल्लाहच्या हमीवरच तुम्ही तिचा हात हातात घेतला आणि अल्लाहच्या शब्दाच्या आधारावरच त्यांचे शरीर तुम्हाला वैध ठरविले. खचितच तुमच्या पत्नीवर तुमचे काही अधिकार आहेत. वैवाहीक आधिकारांचा आदर राखणे हे त्यांचे आवश्यक कर्तव्य आहे. अनुचित कृत्ये न करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. जर त्यांनी ते केले तर शिक्षा करण्याचा तुम्हाला अधिकार आहे. तरी ती शिक्षा कठोर असु नये. अनुचित कृत्यापासून तुमची पत्नी अलीप्त झाली आणि तुमच्याशी एकनिष्ठ राहीली तर त्यांच्या कपड्यालत्याची खान्यापिण्याची उचित व्यवस्था करा. पहा पत्नींना आदेश द्या पण कृपेने व मायेने द्या. हे लोकांनो मारझोड झालेला व विद्रुप करण्यात आलेला ॲबिसिनीयातील एखादा गुलाम जर तुमचा अमीर (नेता) बनला आणि अल्लाहचा ग्रंथ (त्यातील आदेश) त्याने अमलात आणले तर त्याचे म्हणणे ऐका व त्याच्या आज्ञांचे पालन करा.

हे लोकहो प्रत्येक माणसाला वारसा हक्कात वाटा असावा असा अल्लाहने हुकूम दिला आहे. जन्मलेले मूल हे विवाहशय्येचे असेल आणि विवाह बंधनाचे उल्लंघन करणाऱ्यावर धोंडेमार केली जाईल. तुमचे गुलामाला तुम्ही स्वतः जे खात असाल तेच त्यांना खाउ घाला. तुम्ही जसे कपडे वापराल तसेच त्यांना ही वापरायला द्या. जर त्यांच्या हातून चुक झाली आणि ती माफ करण्याचा तुमचा कल नसेल तर त्यांना मुक्त करून टाका. कारण ते अल्लाहचे दास आहेत आणि त्यांना शिक्षा देता येत नाही.

पहा नीट लक्ष देउन ऐका तुमच्या स्वामीची उपासना करा. दिवसात पाच वेळा नमाज अदा करा. रमजानच्या महिन्यात उपवास करा. काबागृहाची यात्रा करा. तुमच्या मालमत्तेवर जकात तात्परतेने द्या. आणि मी जे काही आदेश देतो त्याचे पालन करा. असे झाले तरच तुम्हाला स्वर्गात प्रवेश मिळेल.

हे लोकहो खचितच तुमचा स्वामी एकच आहे. आणि तुमचा पूर्वजही एकच आहे. तुम्ही सगळे आदमचे वंशज आहात आणि आदमला चिखलमाती पासून निर्माण केले गेले होते. कोणाही अरब माणसाला अरबेत्तर माणसावर प्राधान्य अगर वर्चस्व नाही. तसेच कोणाही अरबेत्तर माणसाला अरबांवर प्राधान्य नाही. त्याचप्रमाणे गोऱ्या माणसाला काळ्या माणसांवर अथवा काळ्या माणसाला गोऱ्या माणसांवर प्राधान्य नाही. जे प्राधान्य आहे ते केवळ ईश्वरभयाच्या आधारावर.

जे येथे उपस्थित आहेत त्यांनी उनुपस्थिता पर्यंत हा संदेश पोहचवावा. कारण ज्यांना हा संदेश पोहचविला जाईल. त्यांच्या पैकी बरेच जण या श्रोत्यापेक्षा अधिक सावध असतील ही समाधानाची गोष्ट आहे.

पहा तुम्हा पैकी जवळ असणाऱ्यांनी दूरवर असणा-यांना हा संदेश पोहचवावा. मी संदेश तुम्हाला पोहचविला मग आकाशाकडे पाहत ते म्हणाले 'हे स्वामी मी संदेश पोहचता केला आहे. आणि माझे धर्म कार्य पुर्ण केले आहे. 'होय सर्व लोकांनी त्यांच्या भोवती गर्दी करीत म्हणाले खचितच तुम्ही संदेश पोहचविला आहे.'

'हे स्वामी मी विनवणी करतो की तु यावर साक्ष राहा 'असे उद्‌गार काढीत प्रषितांनी आपले भाषण संपविले.

आणि लगेच प्रेषितांचे सर्व सहाबा (अनुयायी) ज्यांचे तोंड ज्या दिशेला होते. आपआपल्या घरी परत न जाता. संपूर्ण जगात पसरले. व प्रेषितांचे शेवटचे व निरोपाचे भाषण जे केवळ वक्तृत्वपूर्ण होते. इतकेच नसून ते अखील मानव जातीला दिलेल्या उदात्त व भव्य संदेशासाठी उल्लेखनीय होते. त्यात सांगितल्या गेलेल्या निती तत्वापेक्षा अधिक चांगली तत्वे पुढे मांडणे आजपर्यंत जगाला शक्य झालेले नाही. त्यातील प्रत्येक शब्दात भव्यता भरलेली आहे. त्यांचे लक्ष धार्मिकता व नेकी प्रस्थापित करण्याचे आहे. आणि माणसामध्ये व्यवहार पातळीवर सुव्यवहार प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे.

प्रेषितांचे अनुयायी हाच तो संदेश घेउन संपूर्ण जगात पसरल्यामुळे आज जगाच्या काना कोपऱ्यात प्रत्येक ठिकाणी काहीना काही प्रमाणात इस्लाम धर्मीय मुस्लीम समाज पाहावयास मिळतात.

**इद्रीस खान (पुसद)**
**मो. 9422192954**

# सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com




# अकोट शहर पोलिसांची धडाकेबाज कारवाई; 8 चोरीच्या दुचाकींसह 6 लाखांचा मुद्देमाल जप्त

## दोन आरोपी जेरबंद; दोन इंजिन, चेसिस व स्पेअर पार्टही हस्तगत

वि. प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**अकोट :** अकोट शहर पोलिसांनी मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावत दोन आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून ८ चोरीच्या मोटारसायकली, दोन इंजिन, एक चेसिस व विविध स्पेअर पार्ट असा एकूण ६ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे अकोट शहर व परिसरातील वाहनचोरीच्या घटनांच्या तपासाला मोठी गती मिळाली आहे.

याबाबत माहिती अशी की, अकोट शहर पोलीस ठाण्यात १६ ऑगस्ट २०२६ रोजी शिवराज मोहन हाडोळे (रा. नंदीपेठ, अकोट) यांच्या फिर्यादीवरून मोटारसायकल चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. घरासमोर उभी केलेली स्प्लेंडर प्लस मोटारसायकल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची तक्रार त्यांनी दिली होती.

या गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे गजानन प्रभुदास रायबोले (वय २३) व अब्दुल जावेद अब्दुल जमील जमादार (वय ३०, दोघेही रा. इंदिरानगर, येवदा, ता. दर्यापूर, जि. अमरावती) यांना ताब्यात घेण्यात आले. कसून चौकशीदरम्यान त्यांनी अकोट शहर व परिसरातून मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली.

त्यानंतर आरोपींच्या घरांची झडती घेतली असता ८ चोरीच्या मोटारसायकली, दोन मोटारसायकल इंजिन, एक चेसिस तसेच विविध स्पेअर पार्ट असा एकूण ६ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त वाहनांमध्ये शाईन, स्प्लेंडर प्लस व पॅशन प्लस या दुचाकींचा समावेश आहे. सदर जप्त वाहनांचा संबंध इतर पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या वाहनचोरीच्या गुन्ह्यांशी आहे का, याबाबत पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार किशोर जुनघरे, गुन्हे शोध पथक प्रमुख पोउपनि निलेश बारहाते तसेच नरेंद्र जाधव, रामेश्वर भगत, कपिल राठोड, नितेश सोळंके व सुबोध खंडारे यांनी केली.

# माजी विद्यार्थ्यांच्या ठिय्या आंदोलनाला यश



प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**हिवरखेड :** येथील जी प महात्मा गांधी विद्यालयात शिक्षक यांची फार कमी संख्या होती त्यामुळे विद्यार्थी संख्या कमी होत चालली होती, हे या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांच्या डोळ्यात खुपले त्यांनी तत्काळ शाळा वाचविण्यासाठी अकोला जिल्हा परिषद, जिल्हा अधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार करून आपली यंत्रणा कामाला लावली व दिनांक २५ ऑगस्ट रोजी शाळेच्या आवारात डफडी बजाव ठिय्या आंदोलन करण्याचा प्रशासनाला ईशारा दिला आणि हा निर्धार या दिनी पूर्ण केला. आणि त्यांच्या आंदोलनाला यश आले .

शिक्षण विभाग अकोला यांनी तेल्हारा गट शिक्षण अधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार करुन तेल्हारा पंचायत समिती शिक्षण अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील पत्र हिवरखेड जी प शाळेत खिरोडकार सर यांची नियुक्ती करण्यात आली तर स्व इच्छाने मोफत सेवा देणारे कराळे सर रुजू होतील अशी ग्वाही यावेळी देण्यात आली

**आंदोलनकर्ते** - प्रदीप पाटील, शाहरुख लाला निखिल कराळे, अर्जुन खिरोडकार, शहजाद खान, सागर उरकडे, सागर मानकर, धनंजय गावंडे, भारत ताळे , नदीम गौरी, निवृत्ती तायडे, संदीप गावंडे, पवन भडं यांच्यासह अनेक माजी विद्यार्थ्यांनी जी प म शाळेत ठिय्या आंदोलन करून आपली भूमिका पार पाडली. त्यांच्या मागणीला भरगच्च यश आले असून गट शिक्षण अधिकारी यांनी तत्काळ जी प शाळेतील मुख्यध्यापक यांना खिरोडकार सर यांच्या नियुक्तीचे पत्र दिले मुख्यध्यापक कमरअली यांनी ते पत्र आंदोलनातील माजी विद्यार्थ्यांना देऊन आदोलनात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याचे पूजन करून निवारण केले, यावेळी हिवरखेड नगराध्यक्षा सौ सुलभा दुतोंडे यांनी यास्थळी भेट देऊन शाळा नगरपरिषद अंतर्गत आली तर बराच विकास होईल असे मनोगत व्यक्त केले.

# प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन रिल्स विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**अकोट :** अकोट मधील जनजागृती ग्राम स्वच्छता समाज जनजागृती व इतरही पुढाकारात नेहमीच अग्रेसर असलेले धारिणी फॉउंडेशन च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेचा निकाल स्थानिक श्री.शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय सभागृहात रिल स्पर्धा २०२६ प्लास्टिक कचरा, व्यवस्थापन व वृक्षारोपण या स्पर्धेचा वक्षीस वाटप व प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष फाउंडेशन च्या अध्यक्षा डॉ.मनिषा मते, प्रमुख अतिथी डॉ. प्रा. रेखाताई रोडे,अचल बेलसरे नगरसेवक न.प., मेहुलभाई नागदिया, राजेश डांगटे, अविनाश पालेकर,माजी प्रा. एस. जी. वॉलशिंगे, आदींची संकेत उपस्थिती लाभली. 'माझा कचरा माझी जबाबदारी' पातळ प्लास्टिक, बॉटल्स नाकारा, पुनरवापर करा,वृक्ष संवर्धन,पर्यावरण वाचवू या.भाषणातून विचार व्यक्त केले. चला दोस्त हो पर्यावरणावर बोलू काही प्रमुख अतिथी व सहभागी स्पर्धकांना भेट देण्यात आली. प्रथम क्रमांकाचे बक्षीस १००० रु. योगीराज सुशील गावंडे भाऊसाहेब पोटे विद्यालय, द्वितीय ७०० रु. प्रगती प्रवीण पवार यांना, तर तृतीय ३०० रु. बक्षीस वेदांत गजानन सदार भाऊसाहेब पोटे विद्यालय यांना देण्यात आले. सहभागी झालेल्या सर्व रिल स्पर्धेकांना प्रमाण पत्र देण्यात आले. स्पर्धकांच्या रील्स दाखविण्यात आल्या. विशेष सत्कार रुपाली व प्रवीण चांदुरकर चितलवाडी यांनी मुलाच्या ५ व्या वाढदिवसा निमित्य ५ वृक्ष रोपे भेट दिली त्या साठी करण्यात आला. फॉउंडेशन च्या सभासद सुरेखा माकोडे यांचा ज्ञानांकूर उज्वला तायडे यांचा विज्ञानाच्या गवाक्षातुन पुस्तकं प्रकाशना साठी गौरव करण्यात आला. विशेष सहभाग शुभांगी गंगलवार ,पदमा भगत कृष्णाई भजनी मंडळ, एकविरा बचत गट, वंदना शामतकर सोपीनाथ बचत गट सिरसोली,विद्या निकेतन स्कूल प्रीती ठाकरे व संजीवनी कविटकर समूह यांचा लाभला.संस्थेच्या सभासद लता चिकटे,सुषमा मंगळे,सविता हिंगणकर, वर्षा मानकर, लता साबळे, व बहुसंख्य पर्यावरण प्रेमीची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैशाली बाभुळकर.सूत्रसंचलन उज्वला तायडे, आभार सुरेखा माकोडे यांनी मानले.

# बाळापुर शहरात पोलिसांचा लॉन्ग मार्च



**बाळापुर :** शहरात ईद-उन्नबी व आगामी कावळ यात्रा पोळा व गणेश उत्सव धार्मिक परंपरागत सणाच्या निमित्ताने बाळापुर शहरात सुरक्षा व्यवस्था चूक बंदोबस्त ठेवण्यासाठी व कायदा व सुव्यवस्थेचे पालन करण्यासाठी आज संध्याकाळी ठीक साडेपाच वाजता बाळापूर येथील पोलीस स्टेशन कवायत मैदान पासून बाळापुर शहरातील मुख्य बाजार चौक शाही मज्जिद अंजुमन बाजार रोड गिरणी मज्जिद जुनी चावडी जैन मंदिर गुजराती पुरा स्टेट बँक रोड व पुन्हा मुख्य बाजार मार्गे मुख्य कवायत मैदानावर लाँग मार्च समारोप झाला या लॉन्ग मार्चमध्ये बाळापूर शहर मुख्य पोलीस एस आर पी एफ होमगार्ड महिला पोलीस व विशेष सुरक्षारक्षक कवायत मध्ये सामील झाले.

# पातूर शहरात भरदिवसा दोन घरांमध्ये जबरी चोरी; पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**पातूर :** पातूर शहरात भरदिवसा दोन घरांमध्ये अज्ञात चोरट्यांनी हात साफ केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. घरमालक काही वेळासाठी शेजारी गेल्याची संधी साधत चोरट्यांनी घरात प्रवेश करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास केली. या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पातूर पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

निलेश रामकृष्ण बगाडे यांच्या घरातून अंदाजे साडेतीन तोळ्यांचा पट्टा-पोत, १०० मणी आणि सुमारे २५ हजार रुपये रोख असा मुद्देमाल चोरीला गेल्याची माहिती आहे. त्याच परिसरातील मदन जाधव यांच्या घरातून १० ग्रॅम सोने व सुमारे ५० तोळे चांदी चोरीला गेल्याचे सांगण्यात येत आहे.

घरमालक शेजारी गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला आणि काही वेळातच घरातील मौल्यवान वस्तूंवर डल्ला मारला. भरदिवसा घडलेल्या या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दरम्यान, मागील काही तासांतील चोरीच्या घटनांची मालिकाही चिंतेचा विषय ठरत आहे. सोळा तासांच्या कालावधीत पातूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत बोडखा, भंडारज आणि कापशी येथे बकऱ्यांची चोरी झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच पातूर परिसरातील सात शेतकऱ्यांच्या केबल वायर चोरीला गेल्याचे सांगण्यात येत आहे. एकाच कालावधीत घरफोडी, बकरी चोरी आणि केबल वायर चोरीच्या घटना घडत असल्याने चोरट्यांचा धुमाकूळ सुरू असल्याची भावना नागरिक व शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. पोलिसांनी या सर्व घटनांची गांभीर्याने दखल घेऊन चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन चोरीच्या घटनांना आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

भरदिवसा घरांमध्ये चोरी होण्याच्या घटनांमुळे पातूर शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीबाबत नागरिकांमध्ये प्रश्न निर्माण झाले असून पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# हिवरखेड नगरपरिषदवर धडकला विद्यार्थांचा मोर्चा



प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**हिवरखेड :** येथील विद्यार्थ्यांनी चंडिका चौकातून नगरपरिषदवर मोर्चा नेऊन आपल्या मागण्या निवेदनातून नगराध्यक्षा समोर मांडल्या. विद्यार्थ्यांनी खुले क्रीडांगण व सुलभ अभ्यासिका उपलब्ध करून देण्याची मागणी रेटून धरली.

नगराध्यक्षांनी याबाबत केलेल्या पाठपुराव्यांची माहिती दिली. तसेच जमलेल्या विद्यार्थ्यांचे समाधान केले. लवकरच विद्यार्थ्यांचा हा प्रश्न सोडविल्या जाईल अशी ग्वाही यावेळी नगरपरिषद कडून देण्यात आली. महत्त्वाचे प्रश्न विद्यार्थी सातत्याने लावून धरत आहेत. विद्यार्थी मोर्चा मध्ये सहभागी झाले होते.

# 'विठ्ठल माझा विठ्ठल माझा'च्या भजनांनी राजराजेश्वर मंदिर परिसर दुमदुमला



प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अकोला :** श्रावण महिन्याच्या पावन पर्वानिमित्त उमरी येथील गायत्री नगर परिसरातील विठ्ठल रुक्माई भजनी मंडळाच्या वतीने श्री राजराजेश्वर महाराजांच्या कृपाप्रसादासाठी भव्य नामस्मरण व भजन दिंडीचे आयोजन करण्यात आले. यावेळी 'विठ्ठल माझा विठ्ठल माझा'सह विविध भक्तिगीत, भजने व कीर्तनांनी श्री राजराजेश्वर मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री राजराजेश्वर महाराजांची विधिवत पूजा-अर्चना करण्यात आली. त्यानंतर वारकऱ्यांनी श्री गणपती, श्री राजराजेश्वर महाराज, शेगावचे संत गजानन महाराज तसेच विठ्ठल-रुक्माई यांच्या भक्तिगीतांचे गायन, कीर्तन व नामस्मरण केले. टाळ-मृदंगाच्या गजरात निघालेल्या या भजन दिंडीमध्ये भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. विठ्ठल नामाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. भजन दिंडीच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाची भक्ती, परंपरा आणि नामस्मरणाची अखंड परंपरा जपण्यात आली.

# ट्रक-मोटारसायकलची धडक; युवक गंभीर जखमी

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**मूर्तिजापूर :** श्रावण महिन्यानिमित्त लाखपुरी येथील श्री लक्षेश्वर महाराज मंदिरात दर्शन घेऊन मूर्तिजापूरकडे परतणाऱ्या युवकाच्या मोटारसायकलला रसूलपूर फाट्याजवळ ट्रकने धडक दिल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. या अपघातात मोटारसायकल चालक आदित्य बापुराव माहुरे (रा. गाझीपूर, मूर्तिजापूर) हा गंभीर जखमी झाला असून त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. प्राथमिक उपचारानंतर त्याला पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविण्यात आले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आदित्य माहुरे हा एमएच ३० बीजी ७९९१ क्रमांकाच्या स्प्लेंडर मोटारसायकलने लाखपुरीकडून मूर्तिजापूरच्या दिशेने येत होता. त्याचवेळी एमपी ४८ झेडएल ६५११ क्रमांकाचा ट्रक दर्यापूरच्या दिशेने जात होता. रसूलपूर फाट्याजवळ मोटारसायकल चालक ट्रकला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करीत असताना दोन्ही वाहनांची धडक झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

धडकेनंतर आदित्य माहुरे याच्या पायाला गंभीर दुखापत झाली. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तसेच संबंधितांनी तातडीने मदत करत जखमीला ॲम्ब्युलन्सद्वारे एलडीएच हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. मात्र, प्रकृती व दुखापतीची गंभीरता लक्षात घेऊन डॉक्टरांनी त्याला पुढील उपचारासाठी अकोला येथे रेफर केले.

श्रावण महिन्यात दर्शनाहून परतताना अपघात

सध्या श्रावण मास सुरू असल्याने लाखपुरी येथील श्री लक्षेश्वर महाराज मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होत आहे. आदित्य माहुरे हादेखील मंदिरात दर्शन घेऊन मूर्तिजापूरकडे परतत असताना हा अपघात घडल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे धार्मिक स्थळावरून परतणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही या घटनेनंतर ऐरणीवर आला आहे.

पोलिसांची घटनास्थळी धाव

अपघाताची माहिती मिळताच मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी तातडीने भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. ठाणेदार दीपक महाडिक, PSI चंदन वानखडे, ASI संजय खंडारे, HC मंगेश घाटे, PC रितेश मद्दी, गजानन सयाम आणि शंकर खेडकर यांनी घटनास्थळी जाऊन आवश्यक कार्यवाही केली.

# अडगाव बु. येथे ईद-उल-मिलाद उत्साहात साजरी

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अडगाव बु :** येथील मुस्लिम बांधवांच्या वतीने पैगंबर मोहम्मद पैगंबर (स.अ.व.) यांच्या जयंतीनिमित्त 'ईद-उल-मिलाद' (मिलादुन्नबी) उत्साहपूर्ण, शांततेच्या आणि मांगल्याच्या वातावरणात साजरी करण्यात आली.

सकाळच्या सुमारास मशिदीमध्ये विशेष नमाज आणि दुवा पठण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर गावातून भव्य मिरवणूक (जुलूस) काढण्यात आली. हिरवे झेंडे, आकर्षक रोषणाई आणि 'लब्बैक या रसूल अल्लाह'च्या जयघोषाने संपूर्ण अडगाव बु! परिसर दुमदुमून गेला होता. मिरवणुकीदरम्यान ठिकठिकाणी सामाजिक एकतेचा संदेश देणारे फलक लावले गेले होते. तसेच ग्रामस्थांच्या वतीने मिरवणुकीत सहभागी नागरिकांसाठी सरबत, पाणी आणि प्रसादाचे (तबर्रुक) वाटप करण्यात आले. हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा देऊन जातीय सलोख्याचे उत्तम उदाहरण सादर केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक मंडळ आणि बालगोपाल यांनी मोलाचे परिश्रम घेतले. स्थानिक प्रशासनाच्या वतीने पोलीस पाटील हितेश हागे, हिवखेड थानेदार पाटील यांच्या मार्गदर्शनात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्यात अशा उपक्रमांचा फायदा होईल : उपशिक्षणाधिकारी प्रमोद टेकाडे

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**अकोला :** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या वैशिष्ट्यामधील प्रश्न मंजूषा परीक्षा हा एक उपक्रम असून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्यात विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन तयार करण्यात प्रश्नमंजुषा आणि ही परीक्षा महत्त्वाची ठरते, असे प्रतिपादन प्रमोद टेकाडे उपशिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी केले.

ते राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रवी नगर नागपूर, शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद अकोला, अकोला जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ, कुतूहल संस्कार केंद्र ,अकोला, आर डी जी पब्लिक स्कूल अकोला यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय अंतरिक्ष दिन आरडीजी पब्लिक स्कूल अकोला येथे साजरा करण्यात आला. यावेळी बोलत होते. अंतरिक्ष दिनाचे औचित्य साधून शिक्षणाधिकारी (माध्य) अरविंद मोहरे यांचे सूचनेनुसार आणि कुतूहल संस्कार केंद्र व इस्रोचे एज्युकेटर डॉ. नितीन ओक , अकोला जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष डॉ.रवींद्र भास्कर यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यातील विविध शाळेतील वर्ग ८ ते १० च्या विद्यार्थ्यांसाठी लेखी ४० गुणांची परीक्षा व प्रश्नमंजुषा घेण्यात

**आरडीजी पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रीय अंतरिक्ष दिन साजरा**

आली त्यामध्ये सहाशे विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यामधून १६ विद्यार्थी प्रश्नमंजुषेसाठी निवडण्यात आले.

अंतरिक्ष दिनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आरडीजी पब्लिक स्कूलचे कोरियांचन सी.पी. प्राचार्य आरडीजी पब्लिक स्कूल अकोला उद्घाटक सुभाष भालेराव उपशिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद अकोला , उपप्राचार्य श्वेता चौमवाल तसेच ज्यांच्या संकल्पनेतून प्रश्नमंजुषा व परीक्षा देण्यात आली असे डॉ. नितीन ओक व डॉ. रवींद्र भास्कर उपस्थित होते. तसेच विविध शाळांमधील सर्व सहाशे विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक व पालक उपस्थित होते. प्रश्नमंजुषा झाल्यानंतर समारोपीय कार्यक्रमात प्रमोद टेकाडे उपशिक्षणाधिकारी (माध्य) यांच्या हस्ते निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. संचालन निर्मला विलासराव घुंगड व विलास घुंगड तालुकाध्यक्ष विज्ञान अध्यापक मंडळ तेल्हारा यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचे सचिव मुरलीधर थोरात, तालुका विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष विजय पजई, ओरा चक्रे, प्रभू चव्हाण तसेच आरडीजी पब्लिक स्कूलच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**प्रश्नमंजूषेत पात्र विद्यार्थ्यांना अभ्यास दौऱ्यासाठी निवड**

अतिशय महत्त्वाची प्रश्नमंजुषा झाल्यानंतर त्यातील प्रथम तीन क्रमांक व दोन उत्तेजनार्थ आलेल्या विद्यार्थ्यांना इस्रो सायन्स सेंटर तसेच विक्रम साराभाई अणूविज्ञान केंद्र येथे अभ्यास दौऱ्यासाठी नेण्यात येईल. प्रश्नमंजुषेमध्ये प्रथम क्रमांक कोठारी कॉन्व्हेंटचे अथर्व बाहेती व साई भावनेर, द्वितीय क्रमांक जुबली इंग्लिश हायस्कूल चे नीरज ढोरे व नकुल दोड, तृतीय क्रमांक बाल शिवाजी स्कूलचे श्रेयश पाठक व वरद कुलकर्णी तसेच उत्तेजनार्थ प्रथम सेंट एनस स्कूलचे लक्ष दालमिया व लक्ष सुरेखा आणि उत्तेजनार्थ द्वितीय स्कूल ऑफ स्कॉलरचे संस्कृती खैरे व प्रेरणा बेहरा या विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवले.


# नगर परिषद कार्यालय, घाटंजी जि. यवतमाळ

## * ई-लिलाव सूचना *

सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते कि, घाटंजी शहरातील स.नं. १, आ.क्र. ९ (आठवडी बाजार परिसर) येथील छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल ब्लॉक G मधील एकूण १९ दुकान गाळे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यापारी संकुल ब्लॉक II मधील एकूण २१ दुकान गाळ्याचे गाळ्याचे ०३ (तीन) वर्षाच्या कालावधी करिता (प्रतिवर्ष १०% दरवाढ गृहीत धरून) व तदनंतर दर ०३ वर्षांनी पुढील ०६ वर्षांकरिता भाडे पट्ट्याचे नुतनीकरण केले जाईल व ०९ वर्षानंतर सर्व गाळ्यांचे फेरलिलाव करण्यात येईल. खाली नमुद दुकान गाळे भाडे पट्टीवर देण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९२ (३), महाराष्ट्र नगर परिषद (स्थावर मालमत्ता हस्तांतरण) नियम १९८३, स्थायी निर्देश क्र.२४ व शासन निर्णय यामधील शर्ती व अटी यास अधीन राहून सदर ई-लिलाव सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर ई-लिलाव प्रक्रियेचा तपशील खालीलप्रमाणे, तसेच प्रत्येक गाळ्यांचा तपशील व इतर अटी व शर्ती नगर परिषद कार्यालयात तसेच www.eauction.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल.

ई-लिलाव प्रक्रियेचा तपशील (ब्लॉक II)

| अ.क्र. | तपशील | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १) | ई-लिलावात सहभागी होणेसाठी पात्रता मिळवणे. | दि. २५/०८/२०२६ | दि. ११/०९/२०२६ सायं. ५.०० पर्यंत |
| २) | ई-लिलावात पात्रता ठरवण्यासाठी कार्यालयीन कालावधी | दि. १५/०९/२०२६ स. १०.०० पासून | दि. १६/०९/२०२६ सायं. ५.०० पर्यंत |
| ३) | ई-लिलावात पात्र झालेनंतर प्रत्यक्ष ई-लिलावात बोली बोलणेचा कालावधी खालील प्रमाणे | दि. १७/०९/२०२६ स.१०.०० ते सायं.६.०० | |

ई-लिलाव प्रक्रियेचा तपशील (ब्लॉक G)

| अ.क्र. | तपशील | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १) | ई-लिलावात सहभागी होणेसाठी पात्रता मिळवणे. | दि. २७/०८/२०२६ | दि. ११/०९/२०२६ सायं. ५.०० पर्यंत |
| २) | ई-लिलावात पात्रता ठरवण्यासाठी कार्यालयीन कालावधी | दि. १५/०९/२०२६ स. १०.०० पासून | दि. १७/०९/२०२६ सायं. ५.०० पर्यंत |
| ३) | ई-लिलावात पात्र झालेनंतर प्रत्यक्ष ई-लिलावात बोली बोलणेचा कालावधी खालील प्रमाणे | दि. १८/०९/२०२६ स.१०.०० ते सायं.६.०० | |

टिप :- सदर ई-लिलाव प्रक्रीयेबाबत लिलावधारकांच्या शंका/अडचणी असल्यास कार्यालयीन वेळेत (सोमवार ते शुक्रवार स. १०.०० ते ०६.००) कर विभाग, न.प. घाटंजी यांचेशी संपर्क साधावा. तरी सर्व लिलाव धारकांनी याची नोंद घ्यावी.

| (परेश शांतीलाल कारिया) | (सोनल अंकुश ठाकरे) | (राजू एम. घोडके) |
|---|---|---|
| नगराध्यक्ष, न.प. घाटंजी | उपनगराध्यक्ष, न.प. घाटंजी | मुख्याधिकारी, न.प. घाटंजी |

जा.क्र./नपघा/कावि/गाळेवि/ १७५९/२०२६/ दिनांक : २५/०८/२०२६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्यात 78,481 शेतकऱ्यांना 669.90 कोटी रुपयांचे वाटप

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**यवतमाळ :** राज्य शासनाच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि बहुप्रतिक्षित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'च्या दुसऱ्या टप्प्यातील निधीचे सोमवारी थेट वितरण करण्यात आले. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडलेल्या एका विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राज्यभरातील पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमुक्तीची रक्कम हस्तांतरित करण्यात आली. या दुसऱ्या टप्प्यात यवतमाळ जिल्ह्यातील ३४ हजार ८२४ पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २९५ कोटी ५८ लाख रुपये थेट जमा करण्यात आले आहेत. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्याचा एकत्रित विचार करता, यवतमाळ जिल्ह्यातील ७८ हजार ४८१ शेतकऱ्यांना आतापर्यंत ६६९ कोटी ९० लाख रुपयांचा प्रत्यक्ष आर्थिक दिलासा मिळाला आहे.

सह्याद्री अतिथीगृहावर आयोजित या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री, कृषी मंत्री तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या दुसऱ्या टप्प्याअंतर्गत राज्यभरातील एकूण ६ लाख ३६ हजार ३६ पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार ८६ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. आतापर्यंतच्या दोन्ही टप्प्यांत मिळून राज्यातील १२ लाख ५८ हजार २४३ पात्र शेतकऱ्यांना १० हजार ११५ कोटी रुपयांचे कर्जमाफीचे वाटप पूर्ण झाले आहे.

यवतमाळ जिल्ह्यात या कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राष्ट्रीयीकृत बँका आणि महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या माध्यमातून यशस्वीपणे राबवली जात आहे.

जिल्ह्यातील कर्जमाफीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (YDCCB): जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात ३१ हजार ६२१ शेतकऱ्यांना २५३ कोटी ८२ लाख रुपयांचे वाटप करण्यात आले होते. तर दुसऱ्या टप्प्यात ११ हजार ९७१ शेतकऱ्यांना ९५ कोटी ७७ लाख रुपये देण्यात आले. अशा प्रकारे या बँकेच्या एकूण ४३ हजार ६०२ शेतकरी लाभार्थ्यांना ३४९ कोटी ६० लाख रुपयांचा लाभ मिळाला आहे.

व्यापारी व ग्रामीण बँकांच्या लाभार्थ्यांमध्ये पहिल्या टप्प्यात १२ हजार १६ शेतकऱ्यांना १२० कोटी ४८ लाख रुपये, तर दुसऱ्या टप्प्यात २२ हजार ८६३ शेतकऱ्यांना १९९ कोटी ८१ लाख रुपयांचे वितरण झाले. या बँकांमधील एकूण ३४ हजार ८७९ शेतकऱ्यांना ३२० कोटी २९ लाख रुपयांची कर्जमुक्ती मिळाली आहे.

कर्जमुक्तीच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण असून, थकीत कर्जाच्या बोजाखाली दबलेल्या बळीराजाला पुन्हा एकदा बँकिंग प्रणालीत आणून नव्याने पीककर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

योजनेच्या अंमलबजावणीबाबत बोलताना यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड म्हणाले, "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या माध्यमातून राज्यातील बळीराजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा शासनाचा निर्धार आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे आणि संकटांमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्याला पुन्हा आत्मसन्मानाने उभे राहण्यासाठी ही मदत महत्त्वपूर्ण ठरेल. जिल्ह्यातील एकही पात्र शेतकरी या लाभापासून वंचित राहणार नाही, यासाठी शासनस्तरावरून सर्व आवश्यक पाठपुरावा सातत्याने केला जात आहे."

दरम्यान, यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी जिल्ह्यातील उर्वरित पात्र शेतकऱ्यांना तातडीने प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. "कर्जमुक्तीचा लाभ थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची प्रक्रिया अतिशय गतीने आणि पारदर्शक पद्धतीने सुरू आहे. ज्या शेतकऱ्यांची नावे या योजनेच्या पात्रतेच्या यादीत समाविष्ट आहेत, परंतु त्यांनी अद्याप ई-केवायसी (e-KYC) पूर्ण केलेली नाही, त्यांनी तात्काळ जवळच्या सीएससी (CSC) किंवा आधार सेवा केंद्रावर जाऊन आपली आधार पडताळणी पूर्ण करावी," असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

राज्य शासनाच्या या निर्णयामुळे यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, उर्वरित टप्प्यांतील लाभार्थ्यांची यादीही लवकरच प्रसिद्ध केली जाणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# प्राणघातक हल्ल्यातील मास्टरमाईंड मोकाट

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**उमरखेड :** माझ्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याचा मुख्य सूत्रधार अद्यापही मोकाट असून, पोलिसांच्या संगनमताने हा पूर्वनियोजित कट रचण्यात आल्याचा खळबळजनक आरोप शिवसेना (शिंदे गट) कार्यकर्ते रमेश चव्हाण यांनी केला आहे. या हल्ल्यामागे भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांचा हात असल्याचा संशय व्यक्त करत, त्यांची चौकशी करून त्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत केली.

उपचारांनंतर रुग्णालयातून परत आल्यावर चव्हाण यांनी स्थानिक विश्रामगृहात पत्रकारांशी संवाद साधला. १७ जून रोजी रात्री नाथनगर परिसरात चार ते पाच जणांनी चाकू व लोखंडी रॉडने त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला होता. चव्हाण म्हणाले, "मी ३३ वर्षे भाजपमध्ये निष्ठावंत म्हणून काम केले. मात्र पक्षातील एकाधिकारशाहीला विरोध केल्याने व जिल्हा परिषदेच्या जमिनीबाबत आरटीआय (RTI) टाकल्याने नितीन भुतडा माझ्यावर नाराज होते. या राजकीय वैमनस्यातूनच हा हल्ला झाला."

यावेळी त्यांनी पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. रुग्णालयात दिलेला जबाब ठाणेदारांनी फाडून टाकल्याचा आणि भाजप नेत्याचे नाव वगळण्याचा प्रयत्न केल्याचा घणाघाती आरोप त्यांनी केला.

दरम्यान, भाजप नेते नितीन भुतडा यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. "चव्हाण हे सातत्याने माझ्याविरुद्ध सोशल मीडियावर बदनामीकारक लिखाण करत आहेत. पोलिसांच्या तपासात किंवा आरोपींच्या जबाबात माझे नाव नसतानाही राजकीय हेतूने मला बदनाम केले जात आहे. याविरोधात मी न्यायालयात मानहानीचा दावा दाखल करणार आहे," असा इशारा भुतडा यांनी दिला.

या पत्रकार परिषदेला शिवसेना शहरप्रमुख ॲड. संजीवकुमार जाधव व बसवेश्वर क्षीरसागर उपस्थित होते. आता या प्रकरणात पोलीस अधीक्षक काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दहा लाखाची नाली सहा दिवसांत खचली

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**पुसद :** कृष्णानगर ग्रामपंचायत, वसंतपूर येथे जनसुविधा योजनेतून दहा लाख रुपये खर्चुन बांधण्यात आलेली सिमेंट काँक्रिट नाली निकृष्ट कामामुळे अवघ्या सहा दिवसांतच खचली. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत असून, चौकशीची मागणी करण्यात आली आहे. नाली बांधकामात निकृष्ट वाळूचा वापर आणि डस्ट, सिमेंट, लोखंड व गिट्टीचा कमी प्रमाणात वापर करण्यात आला. तसेच नालीचा बेड, खोली व रुंदीही अंदाजपत्रकानुसार केली नसल्याचा आरोप आहे. त्यामुळे लाखो रुपये खर्चुन बांधलेली नाली पहिल्याच पावसात खचली. वसंतपूर येथील नाली कामाची तांत्रिक तपासणी करून दोषींवर कारवाई करावी, संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे व कामाचे देयक अदा करू नये, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# मुकूटबन येथील स्वीट मार्टचा परवाना रद्द

## अस्वच्छतेमुळे FDA ची कठोर कारवाई

प्रतिनिधी २६ ऑगस्ट




**झरी जामणी :** मुकूटबन येथील पुरोहित बिकानेर स्वीट मार्टमधील स्वयंपाकघरासह लगतच्या परिसरात आढळलेल्या गंभीर अस्वच्छतेप्रकरणी अखेर अन्न व औषध प्रशासनाने (FDA) धडक कारवाई करत संबंधित आस्थापनाचा परवाना रद्द केला आहे.

अन्न व औषध अधिकारी डॉ. सचिन नरवाडे, विशाल वाघ व त्यांच्या पथकाने या स्वीट मार्टची अचानक पाहणी केली. तपासणीदरम्यान स्वयंपाकघर आणि परिसरात कमालीची अस्वच्छता आढळून आली.

तसेच लगतच्या भाजी बाजारामुळे परिसरात डुकरांचा वावर असल्याचे निदर्शनास आल्याने पथकाने सर्व परिस्थितीचे छायाचित्रण केले. दोन दिवस चाललेल्या सखोल चौकशीनंतर सोमवारी दुपारी परवाना रद्दचे अधिकृत आदेश जारी करण्यात आले.

> "स्वयंपाकघर आणि परिसरात वाजवीपेक्षा जास्त अस्वच्छता आढळून आल्याने सखोल चौकशीअंती परवाना रद्द करण्याचे आदेश दिले आहेत."
> - डॉ. सचिन नरवाडे (अन्न व औषध अधिकारी, यवतमाळ)

# राळेगाव येथे पोलिसांचा रूट मार्च

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**राळेगाव :** आगामी काळात येणारे सण उत्सव, ईद-ए-मिलादुन्नबी, गणेशोत्सव, व इतर सण शांततेत पार पडावे, कुठलाही अनुचित प्रकार घडू नये याची खबरदारी म्हणून राळेगाव शहरात राळेगाव पोलीस स्टेशनच्या वतीने रूट मार्च काढण्यात आला होता.

पांढरकवडा उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल, राळेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शितल मालटे यांच्या मार्गदर्शनाखाली राळेगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश धंदे यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी, कर्मचारी व होमगार्ड यांनी पोलीस स्टेशन पासून क्रांती चौक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक, बस स्टॅन्ड परिसरातून शांतीनगर, गोंडपुरा, मारवाडी चौक ते मुख्य बाजारपेठ येथून परत पोलीस स्टेशन पर्यंत पतसंचलन केले. राळेगाव शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावे याकरिता खास करून बस स्टॅन्ड परिसरात महिला व पुरुष होमगार्डची तैनाती करण्यात आली, तसेच मुख्य बाजारपेठ शाळा महाविद्यालय परिसरामध्ये पोलिसांकडून पेट्रोलिंग सुद्धा करण्यात येत आहे.

# उमरी (कापेश्वर) येथील विकासकामांच्या चौकशीची मागणी

## ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्य आक्रमक; गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**आर्णी :** उमरी (कापेश्वर) येथील आदिवासीबहुल ग्रामपंचायतीच्या कारभारावरून ग्रामस्थ, सदस्य आक्रमक झाले आहेत. आर्थिक व्यवहारांसह विकासकामांत अनियमितता झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी आर्णीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मागील कालावधीतील ग्रामसभा ठराव, अंदाजपत्रक, देयके, मोजमाप पुस्तिका (MB), वर्क ऑर्डर, पूर्णत्व प्रमाणपत्र, लेखापरीक्षण अहवाल तसेच १५ वा वित्त आयोग, मनरेगा, जल जीवन मिशन व प्रधानमंत्री आवास योजनेच्या निधीची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

तसेच ग्रामपंचायत सदस्य सौ. वैशाली अतुल वानखेडे व सौ. वनमाला तुळशीराम धुर्वे यांनी स्वतंत्र निवेदन देऊन सदस्यांना विश्वासात न घेता कामे करणे आणि मानधन वितरणात पक्षपातीपणा होत असल्याचा आरोप केला आहे. चौकशीत अनियमितता आढळल्यास सरपंच व सचिवांवर कारवाईची मागणी त्यांनी केली आहे. निवेदनाची दखल घेत गटविकास अधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.

निवेदनावर मनोज मेश्राम, मधुकर हटकरे, शत्रुधन तुमराम, निकेश मडावी, अतुल वानखेडे, वैशाली वानखेडे, वनमाला धुर्वे, संजय महावी, संदीप उईके, लक्ष्मण धुर्वे, किशोर गेडाम, देवराव वड्डे, विष्णू धुर्वे, गोवर्धन तोडसाम, कवडू तोडसाम, दत्ता बापुरावे कुमरे, नंदिनी कुमरे, ज्योती कोरवते, सोनू धुर्वे, जोस्ना तोडसाम, माया उईके, सुभद्रा धुर्वे, वंदना आरके, अभिजित तलांडे, अनिता मेश्राम, सीता मात्राम, माधुरी कुमरे, सुनीता कुमरे, अरुण आत्राम, संजय मडावी आणि माधुरी विकी कुमरे याच्या सह्या आहेत.

# पैगंबर मोहम्मद (स.) प्रभावशाली व्यक्ती

## मायकल हार्ट यांच्या ग्रंथात प्रथम क्रमांक

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**मुकूटबन :** अमेरिकन लेखक मायकल एच. हार्ट यांच्या 'The 100: A Ranking of the Most Influential Persons in History' या ग्रंथात पैगंबर मोहम्मद (स.) यांना इतिहासातील सर्वाधिक प्रभावशाली व्यक्ती म्हणून प्रथम स्थान देण्यात आले आहे. १९७८ च्या मूळ आवृत्तीनंतर १९९२ च्या सुधारित आवृत्तीतही हा क्रम कायम ठेवण्यात आला. ईद-ए-मिलादच्या निमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा जागतिक प्रभाव पुन्हा चर्चेत आल्याची माहिती ॲड. इम्रान देशमुख यांनी दिली.

हार्ट यांच्या मते, पैगंबर मोहम्मद (स.) यांचा प्रभाव धार्मिक क्षेत्रासोबतच सामाजिक व्यवस्था, कायदा, राजकारण, संस्कृती आणि समाजसंघटनावरही मोठ्या प्रमाणावर पडला. या ग्रंथात सर आयझॅक न्यूटन, येशू ख्रिस्त, गौतम बुद्ध, योहान गुटेनबर्ग, ख्रिस्तोफर कोलंबस आणि अल्बर्ट आइन्स्टाइन यांचाही समावेश आहे.

सत्य, न्याय, समानता, दया, क्षमा आणि बंधुभाव हा त्यांच्या संदेशाचा केंद्रबिंदू होता. त्यांनी गरीब, अनाथ, महिला आणि दुर्बल घटकांच्या हक्कांच्या रक्षणावर भर दिला तसेच नैतिकता व माणुसकीचे महत्त्व स्वतःच्या आचरणातून दाखवून दिले.

मानवजात एकाच निर्मात्याची निर्मिती असून माणसांत भेदभाव नसावा, हा त्यांच्या विचारांचा गाभा आहे. त्यांचे विचार व्यापक मानवी मूल्यांशी जोडलेले असल्याचे सांगत ॲड. इम्रान देशमुख यांनी ईद-ए-मिलादच्या निमित्ताने समाजात शांतता, प्रेम आणि बंधुभाव वाढीस लागावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानंतरही नगरपरिषदेकडून अहवाल रखडला?

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**उमरखेड :** नगरपरिषदेचे उपाध्यक्ष शेख जाबेर शेख समद कुरेशी यांनी निवडणूक नामनिर्देशन पत्रात मालकी व ताब्यात नसलेल्या मालमत्तेबाबत कथित चुकीची माहिती नमूद केल्याची तक्रार करण्यात आली होती. यावर जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांनी वस्तुनिष्ठ अहवाल मागवला होता. मात्र, महिना उलटूनही अहवाल सादर न झाल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते शेख इरफान शेख ईसा व सुरेंद्रनाथ पंजाबराव दळवी यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन संपूर्ण चौकशीची कागदपत्रे, फाईल नोटिंग व अहवालाच्या प्रमाणित प्रती मागितल्या आहेत. पत्रावर काय कारवाई झाली? चौकशी अधिकारी नियुक्त केला का? महसूल अभिलेख तपासले का? आणि अंतिम अहवाल पाठवला का? या प्रश्नांची उत्तरे दस्तऐवजांसह देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अहवाल सादर करण्यास विलंब का होत आहे, प्रशासनावर सत्ताधाऱ्यांचा दबाव आहे का, असा संशयही व्यक्त होत आहे. समाधानकारक उत्तर किंवा दस्तऐवज न मिळाल्यास जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, राज्य माहिती आयोग व न्यायालयात कायदेशीर लढा उभारण्याचा इशारा निवेदनकर्त्यांनी दिला.

# आता कृषी सहाय्यक करणार 'ई-पीक' पाहणी

## शेतकऱ्यांना एकही रुपया देण्याची गरज नाही

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**यवतमाळ :** यंदाच्या खरीप हंगामात पिकांची १०० टक्के पाहणी केंद्र शासनाच्या 'डिजिटल पीक पाहणी' मोबाईल ॲपद्वारे नियुक्त सहायकांमार्फत केली जाणार आहे. या नव्या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना स्वतः पीक नोंदणी करण्याची आवश्यकता राहणार नाही.

जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, तहसील कार्यालयामार्फत नियुक्त महसूल सेवक, ग्राम रोजगार सेवक, आशा सेविका व इतर मानधनावरील कर्मचाऱ्यांद्वारे ही नोंदणी पूर्ण केली जाईल. या कामावर ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे (तलाठ्यांचे) थेट नियंत्रण असेल. या सेवेसाठी शेतकऱ्यांनी कोणत्याही सहायकाला पैसे देण्याची गरज नाही, कारण शासनामार्फत त्यांना स्वतंत्र मानधन दिले जाणार आहे.

ई - पीक नोंदणीची अंतिम मुदत १० नोव्हेंबर २०२६ पर्यंत आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या गावातील ई-पीक पाहणी सहायकाचे नाव व संपर्क क्रमांक तलाठी, कृषी सहायक किंवा स्थानिक प्रशासनाकडून मिळवून घ्यावा आणि आपल्या शेतातील पिकांची अचूक नोंदणी करण्यासाठी त्यांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पीक कर्ज मिळवणे, पीक विमा दावा करणे आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी ई-पीक पाहणी अत्यंत महत्त्वाची असल्याने सर्व शेतकऱ्यांनी या प्रक्रियेत सहभाग नोंदवावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# दिग्रसमध्ये पोलीस भरती पूर्वपरीक्षेला प्रतिसाद

## २१० युवक-युवतींचा सहभाग

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**दिग्रस :** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दिग्रसमध्ये पोलीस भरती पूर्वपरीक्षेचे आयोजन करण्यात आले. बा. बु. कला, ना. भ. वाणिज्य व बा. पा. विज्ञान महाविद्यालयात झालेल्या या उपक्रमात २१० युवक-युवतींनी सहभाग नोंदवला. यात २६ जुलै रोजी लेखी परीक्षा, तर २ ऑगस्ट रोजी मैदानी चाचणी पार पडली.

१५ ऑगस्ट रोजी विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूल येथे न.प. दिग्रसचे उपाध्यक्ष सचिन बनगिनवार यांच्या अध्यक्षतेखाली पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन न.प. शिक्षण सभापती डॉ. संजयजी बंग यांनी केले, तर दिग्रसचे ठाणेदार वैजनाथ मुंडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी राहुल शिंदे, राजकुमार वानखडे, अमोल राठोड, युवासेना विधानसभा अध्यक्ष जॉकी राठोड, महिला व बालकल्याण सभापती स्वाती धाडवे, न.प. उपसभापती कविता सुकळकर व निलेश कुटे यांची विशेष उपस्थिती होती.

विजेत्यांना रोख पारितोषिके, 'वर्दीचा राजमार्ग' पुस्तके (सचिन बनगिनवार यांच्याकडून) व बॅग (राहुल शिंदे यांच्याकडून) देण्यात आल्या.

पुरुष गटातील बक्षिसांसाठी श्याम लोखंडे, निलेश मुंडे व अमोल राठोड, तर महिला गटासाठी विजय जाधव, जयप्रकाश राठी व स्वप्निल सोनवणे यांनी योगदान दिले. डॉ. संजयजी बंग (७१ टी-शर्ट) व निलेश कुटे (३१ टी-शर्ट) यांच्यातर्फे पहिल्या १०० विद्यार्थ्यांना टी-शर्ट वाटप करण्यात आले.

मैदानी चाचणीतील उत्कृष्ट कामगिरीसाठी स्वातीताई धाडवे (८०० मी.), कविता सुकळकर (१००.), पूजा राऊत (गोळाफेक), निखिल मस्के (१६०० मी.), कैलास तायडे (१०० मी.), विराज राठोड (गोळाफेक) यांच्याकडून विशेष बक्षिसे देण्यात आली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप रत्नपारखी यांनी केले. सुरज कुटे, अमोल राठोड, लुकेश ढंडोरे, उमेश भटकर, अभिजीत साबळे, राजकुमार साळवे यांनी नियोजन केले, तर करण गाडे यांनी अल्पोपाहाराची सोय केली. चंद्रशेखर रबडे, मुकेश देशमुख, सादिक गारवे, स्वप्निल आडे व सुरेंद्र राठोड यांच्या मार्गदर्शनामुळे हा उपक्रम यशस्वी झाला.

# ठाणेदार पितांबर जाधव व पथकाला प्रशस्तीपत्र

## आरोपीला ट्रिपल जन्मठेपेची शिक्षा; अप्पर पोलीस महासंचालक यांच्या हस्ते सन्मान

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**आर्णी :** आर्णी पोलीस स्टेशनचे तात्कालिक ठाणेदार पितांबर जाधव यांना बोरगाव येथील सहा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर झालेल्या बलात्कार प्रकरणातील उत्कृष्ट तपासाबद्दल आज पुणे येथे माननीय अप्पर पोलीस महासंचालक, पुणे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या गंभीर गुन्ह्याच्या तपासात तात्कालिक ठाणेदार पितांबर जाधव तसेच दारवा उपविभागीय पोलीस अधिकारी आदित्य मिरखेलकर यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकात पोलीस उपनिरीक्षक बापूराव दोडके, बीट जमादार सतीश चौधर, बीट रायटर विकास खंदारे व कोर्ट मोहरर मंगेश जगताप यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

सदर प्रकरणात आरोपीला ट्रिपल जन्मठेपेची शिक्षा झाल्याने या अधिकाऱ्यांना प्रशस्तीपत्राने गौरविण्यात आले. या सन्मानाने पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेला अधिक बळ मिळाले आहे.

# मोठ्या आस्थापनांमध्ये अग्निशमनाबाबत व्यापक मोहिम हाती घेणार-जिल्हाधिकारी

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**अमरावती :** जिल्हा स्त्री रूग्णालयातील घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील मोठ्या आस्थापनांमध्ये अग्निशमन यंत्रणा असावी, यासाठी पाहणी करण्यात येणार आहे. तसेच नागरिकांच्या गर्दीच्या ठिकाणी आगीचा प्रकार घडू नये, यासाठी व्यापक मोहिम हाती घेण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज फायर ऑडीट आणि फायर सेफ्टी ऑडीट, इतर उपाययोजनांबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी, जिल्हा स्त्री रूग्णालयात घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी उपाययोजना करण्यावर भर दिला. यासाठी जिल्ह्यातील सर्व मोठ्या आस्थापना आणि शासकीस कार्यालयांची येत्या आठ दिवसांत पाहणी करावी. यात प्रामुख्याने अग्निशमनाबाबत उपाययोजना सुचविण्यात याव्यात. तसेच या सूचना पुढील आठ दिवसात अंमलात आणाव्यात. यासाठी आस्थापनांना जबाबदार धरून त्यांच्याकडून अग्निशमन यंत्रणांची दुरूस्ती, देखभाल आवश्यक असलेल्या ठिकाणी नवीन यंत्रणा बसविण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत राखण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण दर महिन्याला देण्यात यावे. तसेच ही यंत्रणा संबंधित आस्थापनांना सोपविताना जबाबदारी निश्चित करण्यात यावी. जोखमीच्या ठिकाणी अग्निशमन यंत्रणा स्वयंचलित मोडमध्ये ठेवण्यात यावी. तसेच याची नियमित देखभाल आणि दुरूस्ती करण्यावर भर देण्यात यावा. यात प्रामुख्याने स्वयंचलित यंत्रणा कार्यक्षम असल्याची खात्री करावी. अग्निशमन यंत्र वापराबाबत प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात यावे. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी याचे प्रात्यक्षिक घेण्यात यावे. यातील सुरक्षा विषयक कामांमध्ये कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही.

रूग्णालयात विजेच्या नियंत्रित वापरावर असलेल्या वैद्यकीय उपकरणांना स्टॅबिलायझर जोडण्यात यावेत.

तसेच स्मोक डिटेक्टर कार्यान्वीत होण्यासाठी या यंत्रणेची नियमीत देखभाल करण्यात यावी. मोठ्या ठिकाणी आवश्यकतेनुसार फायर सिलींडर, होज पाईप किंवा स्प्रिंकलर व्यवस्था करण्यात यावी. अग्निशमन यंत्रणेच्या पाहणीसाठी शहरी भागात 50 आणि ग्रामीण भागात 50 टिम तयार करण्यात येतील. त्यानंतर त्यांच्या सूचनेनुसार अग्निशमनाबाबत सुधारणा करण्यात येतील, असे जिल्हाधिकारी येरेकर यांनी सांगितले.

# स्वाभिमान पार्टीची संवाद बैठक संपन्न

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**अंजनगाव :** युवा स्वाभिमान पार्टी मार्गदर्शक सुनिल राणा व जिल्हाध्यक्ष प्रकाश साबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत निमखेड बाजार व चोवसाळा चांदूरबाजार अंजनगाव सुर्जी येथे युवा स्वाभिमान पार्टीची संवाद बैठक संपन्न झाला.

युवा स्वाभिमान पार्टीच्या संघटनात्मक बांधणीसह नागरिकांच्या प्रश्नांवर केली चर्चा; मार्गदर्शक सुनिल राणा यांनी कार्यकर्त्यांना दिल्या महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

चौसाळा येथील सक्रिय कार्यकर्ते श्री किशोर भाऊ काळमेघ यांनी असंख्य कार्यकर्त्यासहित युवा स्वाभिमान पक्षांमध्ये प्रवेश घेतला. YSP जिल्हाध्यक्ष प्रकाश साबळे, दर्यापुर विधानसभा अध्यक्ष संजय भारसाकळे, अजयभाऊ देशमुख, अविनाश काळे, अमोल कोरडे, मंगेश कोकाटे, विक्रम पारडे, श्रीकांत इंगळे यांची प्रमुख उपस्थिती अमरावती - निमखेड बाजार येथे युवा स्वाभिमान पार्टीची संवाद बैठक युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक सुनिल राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या बैठकीला परिसरातील पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक सुनिल राणा यांनी उपस्थित कार्यकर्ते व नागरिकांशी संवाद साधत पक्षाच्या विविध सामाजिक व संघटनात्मक उपक्रमांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पक्षाची विचारधारा व कार्य सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी सातत्याने जनसंपर्क वाढवावा, नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, तसेच तळागाळातील नागरिकांशी मजबूत संपर्क निर्माण करावा, असे आवाहन त्यांनी केले. युवा स्वाभिमान पार्टीच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने जबाबदारीने काम करणे आवश्यक असल्याचे सांगत सुनिल राणा यांनी संघटन मजबूत करण्याबाबत आवश्यक निर्देश दिले. गावागावात व परिसरातील नागरिकांमध्ये पक्षाच्या कार्याची माहिती पोहोचवून अधिकाधिक युवक व नागरिकांना पक्षाच्या संघटनेशी जोडण्यावर भर देण्याचे त्यांनी सांगितले. तसेच नागरिकांच्या स्थानिक समस्या, विकासकामे आणि विविध सामाजिक प्रश्न याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रशासनाशी समन्वय साधून पाठपुरावा करावा, अशी सूचना यावेळी करण्यात आली. उपस्थित पदाधिकाऱ्यांनीही पक्षाच्या आगामी संघटनात्मक वाटचालीबाबत आपले विचार व्यक्त केले.निमखेड बाजार येथे झालेल्या या संवाद बैठकीमुळे युवा स्वाभिमान पार्टीच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, आगामी काळात पक्षाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी दशरथ येवले, लिलताई डिके, सविता बोबडे, सुरेंद्र वाघमारे, मंगेश कोकाटे, कुलदीप पवार, गजानन साठे, डॉ.सुरेश रोंधडे, दादाराव वाघमारे, दिपक अढाऊ, विठ्ठल ढोले, आशिष जवंजाळ, अमोल कावरे, राजु बहादुरे, माकोडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत पुनर्वसनाच्या लाभासाठी सोमठाना खुर्दच्या लाभार्थ्यांना मोबदल्यासाठी आवाहन

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अमरावती :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत सोमठाना खुर्द येथील 42 शेतमुल्यांकनधारक, 21 वनहक्कधारक आणि 112 घरमुल्यांकनधारकांकरिता निधी उपलब्ध झाला असून काही लाभार्थ्यांना मोबदला रक्कम वितरीत करण्यात आली आहे. आवश्यक दस्तऐवजा अभावी उर्वरित लाभार्थ्यांना मुल्यांकन रक्कम अदा करण्यास अडचण येत आहे, अशा लाभार्थ्यांना अकोट वन्यजीव विभाग अकोट येथे तातडीने दस्तऐवज सादर करण्याचे आवाहन, अकोट वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक आर.एस.टोलिया यांनी केले आहे.

वर्ष 2012 च्या शासन निर्णयानुसार सोमठाना खुर्द या गावाचे वर्ष 2013-14 मध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे. या गावातील शेतमुल्यांकनधारक आणि वनहक्कधारकांना मुल्यांकनाची 4 पट रक्कम देय असून यातील 1 पट मुल्यांकन रक्कम व त्यावरील 30 टक्के दिलासा रक्कम वजा करून उर्वरीत मोबदला रक्कम अदा करण्याची प्रक्रिया सुरु आहे. परंतु काही शेतमुल्यांकनधारक, वनहक्कधारक आणि घरमुल्यांकनधारकांनी आवश्यक दस्तऐवज सादर नकेल्याने त्यांना मोबदला अदा करण्यात अडचण येत आहे. या सर्व शेतमुल्यांकनधारक आणि वनमुल्यांकनधारकांनी 100 रुपयांच्या स्टँपपेपर वर अर्ज, बँक खात्याची छायाप्रत,शेतीचा 7/12 आणि शेतमुल्यांकनधारक मयत असल्यास त्यांचे वारसप्रमाणपत्र व वारसाच्या खात्याची छायाप्रत तसेच घरमुल्यांकनधारकांनी 100 रुपयांच्या स्टँपपेपर वर अर्ज, बँक खात्याची छायाप्रत,नमुना 8, घरमुल्यांकनधारक मयत असल्यास त्यांचे वारसप्रमाणपत्र व वारसाच्या खात्याची छायाप्रत तातडीने अकोट वन्यजीव विभाग अकोट येथे सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सोमठाना खुर्द येथील लाभार्थ्यांची नाव निहाय यादी mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## आझाद हिंद मंडळाच्या 99 व्या वर्षानिमित्त विशेष रील स्पर्धेचे आयोजन

**अमरावती :** बुधवारा येथील आझाद हिंद मंडळाच्या ९९ व्या वर्षानिमित्त तसेच 'गणेश उत्सव २०२६'च्या पर्वावर मंडळाच्या वतीने विशेष रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. बाप्पाच्या आगमनानिमित्त आणि मंडळाच्या स्थापना दिवसाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या स्पर्धेतून परिसरातील तरुणांच्या कलागुणांना व सृजनशीलतेला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विजेत्यांसाठी आकर्षक रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांकासाठी ₹११,०००, द्वितीय क्रमांकासाठी ₹५,०००, तर तृतीय क्रमांकासाठी ₹३,००० असे बक्षिसांचे स्वरूप आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क ₹९९ असून, स्पर्धेचे आयोजन १४ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात येणार आहे.

# कृषी पर्यटन केंद्र संचालकांची "मामाचं वावर" येथे

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अमरावती:** पर्यटन संचालनालय प्रादेशिक, अमरावती अंतर्गत अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागातील कृषी पर्यटन केंद्र संचालकांसाठी 18 ऑगस्ट 2026 रोजी "मामाचं वावर" कृषी पर्यटन केंद्र, मौजे वळती, ता. चिखली, जि. बुलढाणा येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागातील विविध जिल्ह्यांतून आलेले कृषी पर्यटन केंद्र संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून पर्यटन संचालनालय प्रादेशिक कार्यालयाचे उपसंचालक विजय जाधव, शाश्वत विकास केंद्र (अमरावती) चे गणेश चौधरी, कृषी पर्यटन केंद्र संचालक समिती (महाराष्ट्र राज्य) चे अध्यक्ष लहू अवताडे आणि कॅनव्हास फाउंडेशन, द चॅरिटेबल ट्रस्ट (अमरावती) चे आशिष शेरेकर उपस्थित होते.

या कार्यशाळेत उपसंचालक विजय जाधव यांनी महाराष्ट्राचे पर्यटन धोरण 2024 अंतर्गत कृषी पर्यटन, साहसी पर्यटन, प्रोत्साहन, होमस्टे, पर्यटन व्हिला, व्हॅकेशन होम अशा अधिकृत नोंदणी प्रक्रिया आणि कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा आर्थिक विकास कसा साधता येईल, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच आजच्या डिजिटल युगात ए.आय चा वापर कसा करता येईल यावरही त्यांनी प्रकाश टाकला. गणेश चौधरी यांनी कृषी पर्यटन केंद्र चालवताना निसर्गाचा समतोल राखून शाश्वत विकासाची कास कशी धरावी आणि स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर कसा करावा, याबद्दल तांत्रिक व व्यावहारिक माहिती दिली.

अध्यक्ष लहू अवताडे यांनी राज्यातील कृषी पर्यटनासमोरील आव्हाने, संचालकांचे संघटन आणि पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व्यावसायिक दृष्टिकोन कसा असावा, यावर आपले अनुभव अभ्यासपूर्ण रितीने मांडले. तसेच शाळेच्या सहली व शासनाच्या विविध विभागांशी कसा समन्वय साधता येईल यावर मार्गदर्शन केले.

याप्रसंगी अमरावती विभागातील विजय श्रीराव (महेंद्री कृषी पर्यटन केंद्र, वरुड), सुनील वारे (वनश्री कृषी पर्यटन केंद्र, उदखेड) तसेच छत्रपती संभाजीनगर विभागातील मातोश्री कृषी पर्यटन केंद्र (अंबड) आणि श्री गोकुळ कृषी पर्यटन केंद्र (जालना) येथील संचालकांनी आपले अनुभव सांगितले.

या एक दिवसीय कार्यशाळेमुळे अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागातील कृषी पर्यटन केंद्र संचालकांना केंद्राचा दर्जा उंचावण्यासाठी नवीन नियमावली समजून घेण्यास व नवनवीन संकल्पना राबवण्यास मोठी दिशा मिळाली आहे.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त माय भारत केंद्राकडून विविध उपक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अमरावती :** माय भारत केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त 27 ऑगस्ट रोजी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे 27 ऑगस्ट रोजी देशभरातील 1600 ठिकाणी सहभागी होणाऱ्या आठ लाखांहून अधिक युवकांना आभाशी माध्यमातून संबोधन करणार आहे. याद्वारे देशभरातील युवक आभासी माध्यमातून एकत्र जुळणार आहेत. पंतप्रधानांच्या संबोधनानंतर येथील पोटे पाटील महाविद्यालय आणि बियाणी महाविद्यालयात प्रवेश सकाळी 10 वाजता कार्यक्रम होणार आहे. या अंतर्गत युवक संवाद व विविध सहभागात्मक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे. माय भारत स्वयंसेवक आणि स्थानिक खेळाडू यांच्यात विशेष युवा संवाद सत्र आयोजित करण्यात येणार आहे. गेल्या 12 वर्षांत भारताच्या क्रीडा पायाभूत सुविधांमध्ये तसेच क्रीडा क्षेत्राच्या विकासात झालेल्या परिवर्तनावर चर्चा करण्यात येणार आहे. अमरावती जिल्ह्यातील युवक, माय भारत स्वयंसेवक, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, महाविद्यालयीन विद्यार्थी, खेळाडू आणि क्रीडा क्षेत्राशी संबंधित व्यक्तींनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठाणाच्या विविध योजनांसाठी 31 ऑगस्टपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अमरावती :** भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठाण, कोलकाता यांच्या समान (Matching) व असमान (Non-Matching) निधी योजनांतर्गत सन २०२६-२७ साठी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. इच्छुक ग्रंथालयांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यातील प्रस्ताव संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे दि. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन प्र. ग्रंथालय संचालक अशोक मा. गाडेकर यांनी केले आहे. ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या माध्यमातून राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध अर्थसहाय्य योजना राबविण्यात येतात. या योजनांचे नियम, अटी तसेच अर्जाचा नमुना राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठाणाच्या www.rrrlf.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून इच्छुक ग्रंथालयांनी तेथून अर्ज डाउनलोड करून भरावेत.

सन २०२६-२७ साठी समान निधी (Matching) योजनेअंतर्गत इमारत बांधकाम व विस्तारासाठी कमाल २५ लाख रुपये अर्थसहाय्य उपलब्ध आहे. या योजनेव्यतिरिक्त इतर समान निधी योजनांचा लाभ केंद्रीय पद्धतीने देण्यात येणार असल्याने त्या योजनांसाठी प्रस्ताव सादर करू नयेत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

असमान निधी (Non-Matching) योजनांमध्ये ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ, साधनसामग्री, फर्निचर खरेदीसाठी ४ लाख रुपये तसेच इमारत बांधकामासाठी (प्रस्ताव फक्त एकदाच) १० ते १५ लाख रुपये अर्थसहाय्य उपलब्ध आहे. तसेच "ज्ञान कोपरा" विकसित करण्यासाठी २.५० लाख रुपये व विशेष आधुनिकीकरणासाठी २ लाख रुपये अर्थसहाय्य दिले जाणार आहे. याशिवाय ग्रंथालयांच्या ५०, ६०, ७५, १००, १२५ आणि १५० व्या महोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यासाठी ६.२० लाख रुपये तसेच इमारत विस्तारासाठी १० लाख रुपये अर्थसहाय्य उपलब्ध आहे. राष्ट्रस्तरीय चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग आणि आयोजनासाठी १.५० लाख, २.५० लाख व ३ लाख रुपये अर्थसहाय्य देण्यात येणार असून "बालकोपरा" स्थापन करण्यासाठी कमाल ६.८० लाख रुपये अर्थसहाय्याचा लाभही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. योजनेसाठी इच्छुक ग्रंथालयांनी आवश्यक कागदपत्रांसह इंग्रजी किंवा हिंदी भाषेत प्रस्ताव चार प्रतींमध्ये संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे दि. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर करावेत.

# कावड यात्रा ही भगवान शंकराच्या भक्तांची एक वार्षिक - धार्मिक व पवित्र वारी - यश सुलभा खोडके



प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अमरावती :** आज जग वेगाने बदलत आहे.माणूस अधिक आधुनिक होत आहे. मोबाईल, इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, सोशल मीडिया, डिजिटल व्यवहार, ऑनलाईन शिक्षण - सगळे जीवन बदलून गेले आहे. पण माणसाच्या मनाला आजही श्रद्धेची गरज आहे. आजही त्याला समुदायाची गरज आहे. आजही त्याला कुणीतरी " तू एकटा नाहीस " असे सांगणाऱ्या हाताची गरज आहे. कावड यात्रा ही गरज काही प्रमाणात पूर्ण करते. ती हजारो लोकांना एकत्र आणते. एकाच दिशेने चालायला शिकवते. सर्वात महत्वाचे स्वतःपेक्षा मोठ्या एखाद्या शक्तीसमोर नतमस्तक व्हायला शिकवते.धार्मिक मान्यतेनुसार भगवान परशुरामांनी सर्वात प्रथम कावड आणले आणि शिवलिंगावर गंगाजलचा अभिषेक केला. अशी मान्यता आहे की त्यांनी गढमुक्तेश्वर येथून गंगाचे पाणी आणले आणि शिवलिंगाला अर्पण केले.

# 34 हजार 462 मेट्रीक टन युरीयाचा पुरवठा खतांच्या अनधिकृत दरवाढीबाबत जिल्ह्यात एकही लेखी तक्रार नाही

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अमरावती :** खरीप हंगामासाठी जिल्ह्यात खतांचा पुरवठा सुरळीत झाला असून 12 ऑगस्ट 2026 पर्यंत 34 हजार 462 मेट्रीकटन (मे.ट.) युरिया, 10 हजार 270 मे. ट. डिएपी, 5 हजार 374 मे.ट. एमओपी, 45 हजार 799 मे.ट. संयुक्त खते आणि 20 हजार 526 मे. ट. एसएसपी खतांचा पुरवठा झाल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी सांगितले असून युरीया व डिएपी खतांच्या तुटवडयाबाबत वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित वृत्तांबाबत अधिकृत स्पष्टीकरण दिले आहे.

खरीप हंगामात खतांच्या अनधिकृत दरवाढीबाबत जिल्ह्यात आजपर्यंत कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झाली नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्ह्यात एप्रिल महिन्यात खतांच्या रॅक लागण्यास विलंब झाला मात्र लवकरच पुरवठा सुरळीत करण्यात आला. रासायणीक खतांच्या किमंतीत कोणतीही वाढ झाली नाही. विशेषत: केंद्र शासन युरीयाच्या किमंती नियंत्रीत करीत असल्याने त्याच्या किमंतीत दरवाढ झालेली नाही. तसेच डिएपीच्या किमंतीत वाढ नाही. फोस्फेटिक आणि पोटॅशिक खतांच्या बाबतीत केंद्र शासनाचे पोषणतत्व आधारीत अनुदान लागू असल्याने किमंतीत वाढ झाली नाही.

संयुक्त खतांच्या किमंतीत वाढ झाली असली तरी सर्व रासायणीक खतांच्या किमंतीत सरसकट प्रति बॅग 125 ते 300 रुपयांनी वाढ झालेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

खरीप हंगाम 2026-27 मध्ये शेतकऱ्यांना उच्च दर्जाच्या कृषी निविष्ठा रास्त दरात उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय कृषी निविष्ठा सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली. जिल्हा स्तरीय भरारी पथक स्थापन करुन कृषी सेवा केंद्रांची नियमीत तपासणी करण्यात आली. लिंकींग व तत्सम तक्रारींबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयात शेतकरी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तक्रार निवारणासाठी कृषी सेवा केंद्रांमध्ये क्यु.आर.कोड आणि बियाणे,खते व किटकनाशक संदर्भातील तक्रारींकरिता व्हाट्सअॅप लावण्यात आला.

# आदिवासी विद्यार्थ्यांना ॲनिमियापासून मुक्त करण्यासाठी व्यापक मोहीम

## 'सीएसीआर'सोबत करार; ७९,६२४ विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अमरावती :** आदिवासी विद्यार्थ्यांमधील ॲनिमिया (रक्तक्षय) समस्येचे प्रभावीपणे निर्मूलन करण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत 'ॲनिमिया निवारण कार्यक्रम' राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत दीड महिन्यात राज्यातील २०३ शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच एकलव्य मॉडेल निवासी शाळांमधील ७९ हजार ६२४ विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन (एचबी) तपासणी पूर्ण करण्यात आली आहे.

ॲनिमिया निवारण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने 'सिटिझन्स असोसिएशन फॉर चाईल्ड राईट्स' (सीएसीआर) या संस्थेसोबत सामंजस्य करार केला आहे. या माध्यमातून आश्रमशाळांमधील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन पातळी तपासण्यात येत आहे. आतापर्यंत तपासणी करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये ३७ हजार ९१९ विद्यार्थी आणि ४१ हजार ७०५ विद्यार्थिनींचा समावेश आहे. यामध्ये १४९ शासकीय आश्रमशाळांमधील ५५ हजार ८६८, ४८ अनुदानित आश्रमशाळांमधील २२ हजार ४२० तसेच ६ एकलव्य मॉडेल निवासी शाळांमधील १ हजार ३३६ विद्यार्थ्यांची तपासणी पूर्ण झाली आहे. नाशिक विभागात १०४ शाळांमधील ४१ हजार ४६९ विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी पूर्ण झाली आहे. यामध्ये ८० शासकीय आश्रमशाळांतील ३१ हजार ३९३, २१ अनुदानित आश्रमशाळांतील ९ हजार २२७ आणि ३ एकलव्य मॉडेल निवासी शाळांतील ८४९ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ठाणे विभागात ८१ शाळांमधील ३३ हजार ४२६ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली आहे. यामध्ये ५९ शासकीय आश्रमशाळांतील २२ हजार ५४, १९ अनुदानित आश्रमशाळांतील १० हजार ८८५ आणि ३ एकलव्य मॉडेल निवासी शाळांतील ४८७ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

अमरावती विभागात ८ शासकीय आश्रमशाळांमधील १ हजार ८८५ आणि ३ अनुदानित आश्रमशाळांमधील १ हजार १३ विद्यार्थ्यांची, तर नागपूर विभागात २ शासकीय आश्रमशाळांमधील ५३६ आणि ५ अनुदानित आश्रमशाळांमधील १ हजार २९५ विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. तपासणीदरम्यान ज्या विद्यार्थ्यांमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी आढळून आले आहे, अशा विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार पूरक आहार उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राखण्यासोबतच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठीही हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

"आदिवासी विद्यार्थ्यांचे सुदृढ आरोग्य आणि दर्जेदार शिक्षण याला विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. ॲनिमिया निवारण कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील रक्तक्षयाची समस्या लक्षात घेऊन व्यापक तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. अवघ्या दीड महिन्यात ७९ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी पूर्ण झाली असून, आवश्यकतेनुसार पुढील उपचार व पोषणात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत." अशी माहिती आदिवासी विकास विभाग आयुक्त लीना बनसोड यांनी दिली.

**विभागनिहाय तपासणी झालेली विद्यार्थी संख्या**

| | |
|---|---|
| नाशिक | – ४१,४६९ |
| ठाणे | – ३३,४२६ |
| अमरावती | – २,८९८ |
| नागपूर | – १,८३१ |

आदिवासी विकास विभाग

आदिवासी जनहिताय

महाराष्ट्र शासन

# शिवांगी बेकर्सच्या कामगार एल्गार पुकारणार !
## 7 सप्टेंबरपासून बेमुदत काम बंद, उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**खामगाव :** स्थानिक जनुना तलाव परिसरातील शिवांगी बेकर्स प्रा. लि. मधील कामगारांनी आपल्या विविध प्रलंबित वैधानिक मागण्यांसाठी प्रशासनाकडे अंतिम कायदेशीर नोटीस सादर केली असून, मागण्या मान्य न झाल्यास येत्या ७ सप्टेंबर २०२६ पासून बेमुदत काम बंद व आमरण उपोषण आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. या संदर्भातील रीतसर निवेदन उपविभागीय अधिकारी (स्छह्) कार्यालय तसेच कंपनी व्यवस्थापनाला सादर करण्यात आले आहे. कामगारांचे गंभीर



आरोपः कामगार प्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, कंपनीत अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे सेवा देऊनही कामगारांना किमान वेतन, पीएफ (क्कस्न), ईएसआय (श्वस्द्ध), बोनस, ओव्हरटाईम भत्ता, साप्ताहिक सुट्टी आणि लेखी करारनामा यांसारख्या मूलभूत व कायदेशीर हक्कांपासून वंचित ठेवले जात आहे. व्यवस्थापनाकडून कामगारांची सातत्याने पिळवणूक होत असून हा 'इंडस्ट्रियल डिस्प्युट्स क्ट १९४७' च्या कलम २५-टी नुसार अनुचित कामगार प्रथा असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. प्रशासनाने येत्या ६ सप्टेंबर २०२६ सायंकाळी ५ वाजेपर्यंत यावर लेखी तोडगा न काढल्यास टप्प्याटप्प्याने आंदोलन छेडण्यात येईलः टप्पा १ (७ सप्टेंबर २०२६ पासून): कंपनीतील सर्व कामगारांतर्फे संपूर्ण काम बंद करून कंपनीच्या मुख्य गेटसमोर शांततेच्या मार्गाने बेमुदत धरणे आंदोलन. टप्पा २ (८ सप्टेंबर २०२६ पासून): उपविभागीय अधिकारी (स्छह्) कार्यालयावर सर्व कामगार कुटुंबीयांसह तीव्र निदर्शने व घोषणाबाजी. टप्पा ३- (८ सप्टेंबर २०२६ पासून): मागण्या पूर्ण होईपर्यंत स्छह् कार्यालयासमोर कामगार प्रतिनिधींचे बेमुदत आमरण उपोषण. 'आयडी क्ट' कलम १८ नुसार कामगारांसोबत तात्काळ लेखी करारनामा करावा. पीएफ, ईएसआय, बोनस आणि किमान वेतनाची तात्काळ अंमलबजावणी करून थकीत रक्कम अदा करावी. 'फॅक्टरीज ॲक्ट' नुसार ८ तास कामाची वेळ व कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळावे. या निवेदनावर कामगार प्रतिनिधी दीपक हरीदास सुलताने, विजय रामा मांडवेकर, जयसिंग विनोद सिंग बघेल, सचिन शंकर काटोले यांच्या स्वाक्षऱ्या असून, या आंदोलनाची माहिती कामगार आयुक्त, जिल्हाधिकारी व पोलीस प्रशासनालाही देण्यात आली आहे. संभाव्य आंदोलनामुळे औद्योगिक व प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

# युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये 'रेड डे' उत्साहात साजरा




प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**खामगाव :** युगधर्म पब्लिक स्कूल, खामगाव येथे चिमुकल्या विद्यार्थ्यांसाठी 'रेड डे' मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. शाळेचा परिसर लाल रंगाच्या आकर्षक सजावटीने नटला होता. विद्यार्थ्यांनी लाल रंगाचे विविध पोशाख परिधान करून या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे श्री. गोपाल अग्रवाल यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अशा उपक्रमांमधून मुलांना रंगांची ओळख, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास विकसित होण्यास मदत होते, असे सांगितले. प्राचार्य श्री. अनिरुद्ध अवचार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शैक्षणिक ज्ञानासोबतच विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी लाल रंगाशी संबंधित विविध मनोरंजक आणि शैक्षणिक उपक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत आनंद लुटला.

या उपक्रमाचे नियोजन व आयोजन जिया मतानी, संगीता देशमुख आणि सुषमा बहाकर यांनी परिश्रमपूर्वक केले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह यामुळे 'रेड डे' चा हा उपक्रम अविस्मरणीय ठरला. शिक्षणासोबत आनंद, सर्जनशीलता आणि अनुभवातून शिकण्याचा सुंदर संगम या कार्यक्रमातून पाहायला मिळाला.

# साहित्य समाजाला दिशा देणारे प्रभावी माध्यम !
## खामगाव तालुका साहित्य संमेलनात साहित्यिकांचे विचार

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**खामगाव :** साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून, समाजाला नवी दिशा देणारे प्रभावी माध्यम आहे, असा सूर खामगाव तालुका साहित्य संमेलनात उमटला. राष्ट्रभाषा पुस्तकालयाच्या माध्यमातून २३ ऑगस्ट रोजी खामगाव येथे तालुका साहित्य संमेलन पार पडले. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक डॉ. विकास बाहेकर होते, तर राजेश राजोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. विकास बाहेकर यांनी साहित्यिकांनी समाजकल्याणासाठी सकारात्मक दिशा देण्यासोबतच वाचनसंस्कृती जपण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. राजेश राजोरे यांनी संस्कारक्षम समाजाच्या जडणघडणीत साहित्याची भूमिका स्पष्ट केली. अशोक झुनझुनवाला यांनीही = यावेळी मार्गदर्शन केले. प्रा. शा. ना. बोदडे यांनी राष्ट्रभाषा पुस्तकालयाच्या ७२ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेताना स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांशी असलेल्या भावनिक नात्याचा उल्लेख केला. खामगाव तालुक्यातील साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या साहित्यिक योगदानाचा सन्मान करणे, हा संमेलनाचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रा. मधुकर वडोदे, हितेश सोनी आणि विद्या कावडकर यांनी विविध विषयांवर विचार मांडले. अध्यक्ष सुरेश पारीक यांनी मार्गदर्शन केले, तर सचिव योगेश शर्मा यांनी आभार मानले. मोनिका झुनझुनवाला आणि डॉ. अमित ओसवाल यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आखरे, थोरात आणि फुंडकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात साखर साठ्यावर निर्बंध

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**शेगाव :** जिल्ह्यात साखरेच्या साठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार निर्बंध लागू करण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण विभागाच्या २९ जुलै रोजीच्या आदेशानुसार तसेच २८ जुलै रोजीच्या अधिसूचनेनुसार १ ऑगस्ट पासून साखरेवर स्टॉक होल्डिंग लिमिट लागू करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयातील अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. साखरेचा साठा निर्धारित मर्यादेत राहतो की नाही, याची नियमित तपासणी करण्यासाठी संबंधित कार्यक्षेत्रात तपासणी पथके तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील सर्व साखर व्यापाऱ्यांना शासनाच्या निर्देशानुसार पोर्टलवर तातडीने नोंदणी करण्यास सांगण्यात आले आहे. नोंदणी झाल्यानंतर प्रत्येक शुक्रवारी साखर स्टॉकची स्थिती पोर्टलवर अद्य अद्ययावत करण्याबाबत व्यापाऱ्यांना सूचना देण्यात येणार आहेत. तसेच, व्यापाऱ्यांनी शासनाने निर्धारित केलेल्या मर्यादितच साखरेचा साठा ठेवला आहे का, याची खात्री करणे आवश्यक आहे.

# शेतातील वीजपुरवठा अनियमित; संतप्त शेतकऱ्यांची कोलोरी उपकेंद्रात धडक!

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**खामगाव :** तालुक्यातील कोलोरी वीज उपकेंद्रातून टेंभूर्णा-आवार फिडरवर केवळ सहा तास वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. त्यातही प्रामुख्याने रात्री वीजपुरवठा केला जात असल्याने पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना अंधारात शेतात जावे लागत आहे. या समस्येमुळे संतप्त झालेल्या पिंप्री गवळी आणि टेंभूर्णा येथील शेतकऱ्यांनी २५ ऑगस्ट रोजी कोलोरी येथील वीज उपकेंद्रात धडक दिली. यावेळी त्यांनी वीजपुरवठ्यातील अनियमिततेबाबत संबंधित ५ अधिकाऱ्यांकडे समस्या मांडल्या. शेतीसाठी पुरेशा प्रमाणात आणि सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली. पावसाचा खंड पडल्याने सध्या शेतातील खरीप पिकांना सिंचनाची गरज आहे; मात्र वीजपुरवठ्याचे वेळापत्रक अनियमित असल्याने सिंचनाचे नियोजन करणे शेतकऱ्यांना अवघड होत आहे. रात्रीच्या वेळी शेतात जावे लागत असल्याने सर्पदंश, वन्यप्राण्यांचा धोका तसेच अन्य दुर्घटनांची शक्यता असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.रात्रीच्या वीजपुरवठ्यामुळे अडचणी वाढल्या! पावसाचा खंड पडल्याने खरीप पिकांना सिंचनाची गरज असताना टेंभूर्णा-आवार फिडरवर प्रामुख्याने रात्री वीजपुरवठा केला जात आहे. त्यामुळे पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना अंधारात शेतात जावे लागत आहे. रात्रीच्या वेळी सर्पदंश, वन्यप्राण्यांचा तसेच अन्य दुर्घटनांचा धोका असल्याने दिवसा वीजपुरवठा करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. त्यातच वीजपुरवठा सुरू झाल्यानंतरही वारंवार खंडित होत असल्याने पिकांना आवश्यक तेवढे पाणी देता येत नसल्याची तक्रार त्यांनी केली.

**'टेंभूर्णा-आवार फिडरवरील वीजपुरवठा सुरळीत करा!'**

टेंभूर्णा-आवार फिडरवरील वीजपुरवठा सुरळीत करून दिवसा किमान दहा तास वीज उपलब्ध करून द्यावी, अशी प्रमुख मागणी शेतकऱ्यांनी केली. पावसाचा खंड असताना पिके वाचविण्यासाठी सिंचन हाच प्रमुख आधार असल्याने दिवसा वीजपुरवठा मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. वीजपुरवठ्यात तातडीने सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला. त्यामुळे संबंधित वीज यंत्रणेने शेतकऱ्यांच्या मागणीची तातडीने दखल घेऊन फिडरवरील वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी होत आहे.

# दारूच्या नशेत दुचाकी चालविणाऱ्या तरुणावर गुन्हा

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**मलकापूर :** शहरातील तहसील चौक परिसरात दारूच्या नशेत अनियंत्रितपणे दुचाकी चालविणाऱ्या तरुणाविरुद्ध मलकापूर शहर पोलिसांनी मोटार वाहन अधिनियमाच्या कलम १८५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २४ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास तहसील चौक परिसरात रोहित राजपूत (वय २८, रा. निंबारी, मलकापूर) हा एमएच-२८-सीए-०१२६ क्रमांकाच्या स्प्लेंडर दुचाकीवरून रेल्वे स्टेशनकडून तहसील चौकाच्या दिशेने जात होता. यावेळी तो दुचाकी अनियंत्रितपणे वाकडी-तिकडी चालविताना पोलिसांना आढळून आला. पोलिसांनी त्याला हटकून वैद्यकीय तपासणी केली असता तो दारूच्या नशेत असल्याचा वैद्यकीय अधिकाऱ्यांनी अभिप्राय दिला. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल मोहन करांगळे यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवरून मलकापूर शहर पोलीस ठाण्यात मोटार वाहन अधिनियमाच्या कलम १८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ महेश चोपडे करीत आहेत.

# स्वातंत्र्याच्या 79 वर्षांनंतरही उकळी बु. येथील ग्रामस्थांना तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी थेट बसफेरी नाही

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**पातुर्डा :** स्वातंत्र्याच्या ७९ वर्षांनंतरही संग्रामपूर तालुक्यातील उकळी बु. येथील ग्रामस्थांना तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी अद्याप थेट बसफेरी उपलब्ध नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रोजच्या कामानिमित्त तालुक्याच्या ठिकाणी जाणाऱ्या नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. उकळी बु. येथून संग्रामपूर तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी थेट बस नसल्यामुळे ग्रामस्थांना इतर मार्गांचा किंवा खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो. यामुळे वेळ आणि आर्थिक खर्च दोन्ही वाढत आहेत. दरम्यान, कोद्री येथील पोस्ट कार्यालयात जाण्यासाठीही ग्रामस्थांना मोठ्या अडचणी येत आहेत. पोस्टाच्या विविध कामांसाठी नागरिकांना प्रवास करावा लागत असून, योग्य सार्वजनिक वाहतूक उपलब्ध नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे. ग्रामस्थांनी संबंधित परिवहन विभागाने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन तेल्हारा ते उकळी बु. कोद्री पातुर्डा मार्गे संग्रामपूर जळगाव जामोद अशी थेट बसफेरी सुरू करावी, तसेच शेगाव व तेल्हारा आगाराने तेल्हारा ते शेगाव मार्गे पातूर्डा अशा दिवसभरात किमान ५ फेऱ्या सुरु करणे आवश्यक आहे. नागरिकांनी कोद्री पोस्ट कार्यालयात जाण्यासाठी योग्य वाहतूक सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे. बससेवा सुरू झाल्यास परिसरातील नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार आहे. विशेष म्हणजे तेल्हारा आजाराची बस फेरी उकळी बाजार पर्यंत धावते तर शेगाव आगाराची बस फेरी कोद्री पर्यंत धावते. मधातील केवळ दीड किमी अंतर बाकी आहे. या मार्गावर बस फेऱ्या सुरू झाल्यास परिसरतील बहुतांश गावातील नागरिकांची प्रवाशांची गैरसोय दूर होणार आहे एसटी बस नसल्याने नागरिकांना वळण मार्गे लांबून प्रवास करावा लागत आहे. परिणामी आर्थिक मानसिक व शारीरिक फटका बसत आहे .आता बहुतांश आगाराकडे एसटी बसेस पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत याकडे लोकप्रतिनिधी तसेच एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन या मार्गावर तातडीने बसेस सुरू करणे गरजेचे आहे.

# परवानगीविना झाड तोडले; वन विभागाकडून पंचनामा
## एमआयडीसीतील प्रकार: कारवाईबाबत स्पष्टता नाही!



प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**खामगाव :** नांदुरा मार्गावरील एमआयडीसी सबस्टेशन परिसरात सोमवारी सायंकाळी परवानगीविना निंबाचे झाड तोडल्याचा प्रकार समोर आला आहे.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला आहे; मात्र पुढील कारवाईबाबत अद्याप स्पष्टता नाही. वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाल्यानंतर करण्यात आलेल्या = पाहणीत निंबाचे झाड तोडल्याचे तसेच . परिसरातील अन्य झाडांचेही नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्याची माहिती आहे. याप्रकरणी पंचनामा करण्यात आला असून, उपस्थित साक्षीदार, संबंधित पक्षकार आणि पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्याचेही सांगण्यात आले. दरम्यान, संबंधित अधिकाऱ्याने आवश्यक परवानगी न घेता झाड ठोस तोडल्याचे मान्य केल्याचा दावा करण्यात येत आहे. असे असतानाही पंचनामा झाल्यानंतर कायदेशीर कारवाई झाल्याचे अद्याप समोर आलेले नाही. त्यामुळे वन विभागाकडून पुढील कार्यवाही कधी केली जाणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. पंचनाम्यातील नोंदी, उपलब्ध पुरावे आणि संबंधितांचे जबाब यांची पडताळणी करून नियमानुसार कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# ईको फ्रेण्डली गणेशमुर्ती कार्यशाळा
## एस.बी.कॉनव्हेन्टचा स्तुत्य उपक्रम

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**खामगांव :** सन उत्सवांचा महिना म्हणून श्रावण आणि भाद्रपद महिन्याची ओळख आहेच परंतू या पारंपरिक उत्सवा दरम्यान पर्यावरण व निसर्ग संवर्धन अबाधित राहावे या दृष्टिकोनातून येथील वृक्षमित्र गेल्या ३४ वर्षांपासून सतत प्रयत्नशील असून त्यांना मागील पाच वर्षापासून स्व.शंकरराव बोबडे कॉनव्हेन्ट, खामगांव मोठ्या उत्साहाने सहकार्य करीत असून दरवर्षीच शेकडो बाल मूर्तिकार व पर्यावरण प्रेमी गणेशभक्त विद्यार्थी, शिक्षक व पालक सहकार्य करून पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्नशील आहेत. यावर्षी दि.२५ ऑगस्ट २०२६ रोजी चारशे पेक्षाही जास्त विद्यार्थी वरील उपक्रमात सहभागी झाले व



"माझा बाप्पा - ईको फ्रेण्डली" या शिर्षकाला अनुसरून आपला संपूर्ण गणेशोत्सव पर्यावरण पुरक पध्दतीने साजरा करण्याचा संकल्प घेऊन प्रत्येका पर्यन्त संदेश देणार आहेत.

वरील गणेशमुर्ती प्रशिक्षण करीता येथील वृक्षमित्र संजय गुरव यांनी सहभागी विद्यार्थी व शिक्षकांना अगदी सोप्या पध्दतीने काही मिनिटांत हसतखेळत प्रशिक्षण देऊन पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले.यावेळी मूर्तीवर रंगलेपन हळद, कुंकू, अष्टांग, बुक्का, दरावती,चिंचोका, साबुदाणा, तांदूळ अश्या विविध घरगुती व पर्यावरण पुरक वस्तूपासून करण्याचे मार्गदर्शन व आवाहन करून माझा गणराया विसर्जन सुध्दा घरीच टब, बजेट व गंगाळात विसर्जन करण्याच्या सुचना देवून आपली जलस्रोत सुरक्षित ठेवण्यात पुढाकार घेण्याच्या सुचना या प्रसंगी निसर्गमित्र-निताताई बोबडे यांनी दिल्या. प्राचार्या सौ.ज्योती खांदे यांनी विद्यार्थ्यांमधे सतत सृजन होण्याच्या दृष्टिकोनातून अशा उपक्रमाचे आयोजन आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले तर संस्थेचे अध्यक्ष डाव.प्रशांत बोबडे व सचिव सौ.श्रध्दा बोबडे यांनी प्रत्येक सण पर्यावरण पुरक साजरा करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून उपस्थित विद्यार्थी व शिक्षक यांना आवाहन केले.सर्व वर्गशिक्षक, शारीरिक शिक्षक व चतुर्थ कर्मचारी बहिणी यांनी यशस्वी आयोजन करीता अथक परिश्रम घेतले.

# एकल महिलांसाठी न.प.ची नोंदणी मोहीम

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**शेगाव :** शहरातील एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक, कायदे विषयक, शैक्षणिक, आरोग्य विषयक तसेच पुनर्वसनाशी संबंधित बाबींची माहिती संकलीत करण्यासाठी शेगाव न. प. च्यावतीने विशेष नोंदणी व सर्व्हेक्षण मोहीम राबविण्यात येत आहे. या सर्व्हेक्षणाच्या आधारे भविष्यात शासनाच्या विविध योजनांचा लाभमिळवून देण्यासाठी कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे एकल महिलांनी नोंदणी करण्याचे आवाहन मुख्याधिकारी डॉ. सुरज जाधव यांनी केले आहे.

या सर्व्हेक्षणात परित्यक्ता, घटस्फोटीत व अविवाहित महिलांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शहरातील पात्र एकल महिलांनी २९ ऑगस्ट पर्यंत नोंदणी करुन घ्यावी.

# मोबाइल हॅक करुन 99 हजारांची ऑनलाइन फसवणूक
## मॉलमध्ये गेलेल्या प्रौढाच्या खात्यातून रक्कम वळविली!

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**शेगाव :** शहरातील खामगाव रोडवरील एका मॉलमध्ये खरेदीसाठी गेलेल्या एका प्रौढाचा मोबाइल हॅक करून त्यांच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यातून ९९ हजार ८९९ रुपये परस्पर वळविल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी शेगाव शहर पोलिसांनी २५ ऑगस्ट रोजी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मनोज गंगाधर खुंटे (४७, रा. बुलढाणा) हे १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास पत्नीसोबत शेगाव येथील एका मॉलमध्ये खरेदीसाठी गेले होते. त्यावेळी त्यांचा मोबाइल अचानक गरम होऊन बंद पडला. सुमारे दहा मिनिटांनंतर मोबाइल पुन्हा सुरू झाला. खरेदी केलेल्या कपड्यांचे पेमेंट करण्यासाठी त्यांनी फोन-पेद्वारे व्यवहार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांच्या खात्यातून ९९ हजार ८९९ रुपये अनोळखी खात्यात वळविण्यात आल्याचे निदर्शनास आले. कोणताही व्यवहार केला नसताना खात्यातून रक्कम वळती झाल्याने ऑनलाइन फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकरणी खुंटे यांनी दिलेल्या तक्रारीवरून शेगाव शहर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ (४) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील कलम ६६ (क) व ६६ (ड) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक निमिष मेहेत्रे करीत आहेत. ऑनलाइन फसवणुकीच्या प्रकारात वाढ अलिकडच्या काळात ऑनलाइन फसवणुकीच्या प्रकारात वाढ झाली आहे. मोबाइल फोनद्वारे ओटीपी घेण्यासोबतच मोबाइल हॅक करुन फसवणुकीचे काही प्रकार खामगाव, शेगाव, मलकापूर शहरासह परिसरात घडल्या आहेत. शेतकरी, शिक्षक इतकेच नव्हे तर डॉक्टरांची फसवणूक याद्वारे करण्यात आल्याचे समोर येत आहे.

## कच्ची मशीद परिसरात कडेकोट बंदोबस्त



# ईद उल मिलाद उत्सवाला पोलिसांची हिरवी झेंडी...





प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अकोला:** ईद उल मिलाद उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अकोला पोलिस प्रशासनाने कंबर कसली आहे. उत्सवाच्या पूर्वतयारीचा आणि सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी पोलिस अधीक्षकांनी स्वतः कच्ची मशीद परिसराला भेट देऊन पाहणी केली. संपूर्ण आढाव्यानंतर प्रशासनाने ईद उल मिलादच्या मिरवणुकीला हिरवी झेंडी दाखवली आहे. कुणाला ही पोलिसांची मदत लागली तर त्यांनी ११२ डायल करा असा संदेश एसपींनी दिला. पोलिस अधीक्षकांनी मिरवणूक मार्ग, संवेदनशील ठिकाणे आणि गर्दी होणाऱ्या संभाव्य जागांची प्रत्यक्ष पाहणी करून बंदोबस्ताचे निर्देश दिले. शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जागोजागी कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष पोलिस पथके कार्यरत करण्यात आली आहेत. शहरातील संवेदनशील आणि गर्दीच्या ठिकाणी पोलिसांची विशेष नजर असून, सुरक्षेच्या सर्व आवश्यक उपाययोजना पूर्ण करण्यात आल्या आहेत. उत्सव शांततेत, उत्साहात आणि भाईचाऱ्याच्या वातावरणात पार पाडण्यासाठी नागरिकांनी पोलिस प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे, तसेच अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे, असे आवाहन पोलिस अधीक्षकांनी केले आहे.

## पावसासाठी देव पाण्यात...



प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अकोला:** पाऊस खोळंबल्यामुळे संकट ओढवले आहे. आता देवाला साकडे घातले आहे. 30 वर्षापुर्वी अकोल्यात पाणीटंचाई उद्भवल्याने स्व. नारायणराव गाढे यांनी जुने शहरातील स्वयंभू माणकेश्वर मंदिरात शिवलिंग पाण्यात ठेवत देवाला साकडे घातले होते. यावेळी देखील शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या महान धरणाचा जलसाठा चिंताजनक आहे. तीन दशकानंतर पुन्हा माणकेश्वर मंदिरातील शिवलिंग पूर्णपणे पाण्यात ठेवण्यात आले आहे. अकोलेकरांवरील जलसंकट दूर होईपर्यंत शिवलिंग पाण्यातच राहणार असल्याचे संस्थानच्या वतीने सांगण्यात आले. रुसला पाऊस कधीचा आता पाण्यासाठी "देव" पाण्यात, धरणे तळास लागली पिकेही मोजताहेत अखेरच्या घटका. आता तूच पाव गा श्री राजराजेश्वरा, माणकेश्वरा अशी करूणा भाकली जात आहे...

## विदर्भात बहुतांशी ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अमरावती :** कमी दाबाचे क्षेत्र आता ओरिसा गांगेय पश्चिम बंगाल झारखंड वर आहे. ते ओरिसा झारखंड मार्गे वायव्य दिशेस पुढे सरकण्याची शक्यता आहे. अनुकूल हवामानशास्त्रिय परिस्थिती मुळे पुढील चार पाच दिवस विदर्भात पावसाळी वातावरण राहणार आहे.त्यामुळे विदर्भात बहुतांश ठिकाणी हलक्या मध्यम पावसाची शक्यता आहे.असा अंदाज हवामान तज्ञ प्राध्यापक अनिल बंड व्यक्त केला आहे.आज दर्यापूर सह अनेक ठिकाणी हलका पाऊस झाला. २६,२७,२८ आगस्ट रोजी विदर्भात बरेच ठिकाणी हलक्या मध्यम पावसाची शक्यता आहे.

## जिल्हास्तरीय विद्यार्थी विज्ञान मेळावा करिता परशुराम नाईक विद्यालयाची निवड



प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अकोला :** अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा तसेच राष्ट्रीय विज्ञान नाट्य महोत्सवाच्या तालुकास्तरीय स्पर्धांचे आयोजन सुपा इंग्लिश स्कूल अकोला येथे करण्यात आले होते. या दोन्ही स्पर्धांमध्ये परशुराम नाईक विद्यालय, बोरगाव मंजू येथील विद्यार्थ्यांनी आपल्या दमदार सादरीकरणाने व प्रभावी वक्तृत्वाने प्रथम क्रमांक पटकावत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान पक्के केले. अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्यामध्ये 'भारतीय ऊर्जा क्षेत्र 2047 : संधी आणि आव्हाने' या विषयावर विद्यालयातील विज्ञान शिक्षक श्री. विजय पजई यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता आठवीची विद्यार्थिनी कु.प्रगती होळकर हिने प्रभावी सादरीकरण केले. स्वच्छ ऊर्जेचे महत्त्व, देशात सध्या निर्माण होणारी ऊर्जा, भविष्यातील ऊर्जेची गरज तसेच ऊर्जा क्षेत्रातील संधी व आव्हाने यांचा तिने सांख्यिकीय दृष्टिकोनातून प्रभावी आढावा घेतला.

## कर्मचारी नसतानाही शिक्षण अधिकार्‍याच्या कक्षात पंखे-लाईट सुरु

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**अकोला :** अकोला जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. प्राथमिक शिक्षण अधिकारी रतनसिंग पवार यांच्या कक्षात कर्मचारी अथवा अधिकारी उपस्थित नसतानाही लाईट आणि पंखे सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे शासकीय कार्यालयांमध्ये वीज बचतीसंदर्भात दिल्या जाणाऱ्या सूचनांचे पालन शिक्षण विभागाकडूनच केले जाते का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शासकीय कार्यालयांमध्ये अनावश्यक वीज वापर टाळून विजेची बचत करण्याच्या सूचना वेळोवेळी दिल्या जातात. मात्र, संबंधित कक्षात कोणीही उपस्थित नसताना विद्युत उपकरणे सुरू ठेवली जात असतील, तर या सूचनांच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. विशेष म्हणजे जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग हा विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संबंधित महत्त्वाचा विभाग आहे. त्यामुळे या विभागाकडूनच शासकीय नियम व सूचनांचे काटेकोर पालन अपेक्षित आहे. कर्मचारी उपस्थित नसताना पंखे आणि लाईट सुरू ठेवण्याची नेमकी जबाबदारी कोणाची, तसेच दिवसभरात अशा प्रकारे किती वीज वाया जाते, याची चौकशी होणार का, याकडे आता लक्ष लागले आहे. दरम्यान, या प्रकाराबाबत संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका जाणून घेणे महत्त्वाचे ठरणार असून, प्रशासन याची दखल घेऊन आवश्यक सूचना देणार का, हा प्रश्नही उपस्थित होत आहे.

## 27 ऑगस्टला 'खेलो इंडिया संवाद युवा कनेक्ट'

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अकोला :** राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त माय युवा भारत यांच्या वतीने 'खेलो इंडिया संवाद – युवा कनेक्ट' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन २७ ऑगस्टला शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय येथे सकाळी १० वा. करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा युवकांशी आभासी माध्यमातून संवाद हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असून, युवकांना क्रीडा विकास, युवकांच्या आकांक्षा आणि विकसित भारताच्या संकल्पनेवर संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. देशभरातील १ हजार ६०० ठिकाणांहून ८ लाखांहून अधिक युवक या कार्यक्रमाशी जोडले जाणार आहेत.

# पंचायतराज समितीच्या दौऱ्यापूर्वी जिल्हा परिषद प्रशासनाला जाग!

### वर्षानुवर्षे रखडलेल्या कामांना अचानक वेग

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अकोला :** पंचायत राज समिति येत्या 2, 3 आणि 4 सप्टेंबर रोजी अकोला जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर आता प्रश्न उपस्थित होत आहेत.

जिल्हा परिषद परिसरातील राजर्षी शाहू महाराज सभागृहाशी संबंधित विविध कामे गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेली असल्याचे सांगितले जात आहे. मात्र पंचायत राज समितीच्या दौऱ्याची चाहूल लागताच या कामांना अचानक वेग आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



सभागृहाच्या रंगरंगोटीचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. त्याचबरोबर जिल्हा परिषद परिसरातील मोठ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी, स्वच्छता, परिसराची साफसफाई तसेच इतर डागडुजीची कामेही घाईगडबडीत सुरू असल्याचे दिसून येत आहे.

आता प्रश्न असा उपस्थित होत आहे की, ही कामे जर इतकी आवश्यक होती, तर गेल्या अनेक वर्षांपासून ती पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने तत्परता का दाखवली नाही? आणि पंचायत राज समितीच्या दौऱ्याच्या अगोदरच या कामांना अचानक वेग का आला?

जिल्हा परिषद प्रशासनाकडून ही नियमित स्वरूपाची कामे असल्याचे सांगितले जाते की समितीच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर विशेष तयारी केली जात आहे, याबाबत प्रशासनाची भूमिका स्पष्ट होणे अपेक्षित आहे. पंचायत राज समितीच्या दौऱ्यात जिल्हा परिषदेची कार्यपद्धती, विकासकामे आणि प्रशासकीय व्यवस्थेचा आढावा घेतला जाण्याची शक्यता आहे.

## नरनाळा किल्ला ठरत आहे पर्यटकांचे आकर्षण!

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अकोला :** सातपुड्याच्या कुशीत वसलेला ऐतिहासिक नरनाळा किल्ला सध्या पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरत असून, जंगल सफारी, बोटिंग, ट्रेकिंग, सुळई धबधबा, व्हॅली क्रॉसिंग आणि रॅपलिंग अशा विविध उपक्रमांना पर्यटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे ३ हजार १६१ फूट उंचीवर असलेल्या या किल्ल्याचे क्षेत्रफळ ३९२ एकर असून, किल्ला सुमारे २४ मैल (३८.५ किमी) लांब आहे. किल्ल्यात २२ तलाव, २२ दरवाजे आणि सुमारे ३६० बुरुज आहेत. महाकाली दरवाजा, जाफराबाद व तेलियागड यांसह ऐतिहासिक वास्तू पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

## सेवानिवृत्त बँक मॅनेजर देवचंद लबडे यांचे निधन

प्रतिनिधी २६ ऑगस्ट



**अकोला :** बँक ऑफ बडोदा येथील सेवानिवृत्त बँक मॅनेजर देवचंद विश्रामजी लबडे यांचे बुधवारी सकाळी ७ वाजता धुळे येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. लबडे यांनी आपल्या सेवाकाळात बँकिंग क्षेत्रातील जबाबदारी पार पाडतानाच सामाजिक बांधिलकी जपली. विशेषतः शैक्षणिक क्षेत्रातील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांनी मोलाची मदत केली. आर्थिक अडचणींमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व सहकार्य मिळावे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात राहण्यास मदत झाली. कर्तव्यनिष्ठ, मदतीचा स्वभाव आणि सामाजिक जाणिवेने कार्य करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच परिचितांमध्ये दुःखाचे वातावरण आहे. त्यांची अंत्ययात्रा आज सायंकाळी ४.३० वाजता कपिल वस्तू नगर, अकोला येथील त्यांच्या निवासस्थानाहून निघणार आहे. त्यानंतर सिंधी कॅम्प मोक्षधाम येथे अंत्यविधीचा कार्यक्रम होणार आहे.

# गुणनियंत्रण विश्लेषणात जिल्ह्यातील सोयाबीन बियाण्यांचे 189 नमुने अप्रमाणित

### बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनीविरोध जिल्ह्यातून 2 हजारांवर तक्रारी

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अमरावती :** सोयाबीन बियाण्यांच्या विश्लेषणासाठी जिल्ह्यातील 464 नमुन्यांपैकी 385 नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाले असून 17 ऑगस्ट पर्यंत यातील 189 नमुने अप्रमाणित आढळले आहेत. यासंदर्भात बियाणे उत्पादक कंपनीवर कार्यवाही करण्यात येत असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी सांगितले असून याबाबत वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित वृत्तांची दखल घेण्यात आली आहे. सोयाबीन बियाण्यांच्या एकूण 3 हजार 157 प्राप्त तक्रारींपैकी 2 हजार 326 तक्रारी छत्रपती संभाजीनगर येथील बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनीच्या असून अमरावतीच्या गाडगेनगर पोलीस स्टेशनमध्ये कंपनी विरुद्ध फौजदारी गुन्हा नोंदवण्यात आल्याचेही सांगण्यात आले आहे. विविध कंपन्यांचे सोयाबीन बियाणे उगवले नसल्याबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी तसेच कंपन्यांवर कार्यवाही करण्याविषयी वृत्तपत्रांमध्ये विविध वृत्त प्रसारित झाले होते. याची कृषी विभागाने गंभीर दखल घेत जिल्ह्यात पुरवठा झालेल्या सोयाबीन बियाण्यांचे वितरकनिहाय,वाणनिहाय,लॉट निहाय माहिती आदी सादर करण्याचे आदेश बियाणे उत्पादक कंपन्यांना देण्यात आले. शेतकऱ्यांच्या तक्रारींची पाहणी विहित वेळेत होण्यासाठी तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती गठित करण्यात आल्या.

एकूण प्राप्त झालेल्या 3 हजार 157 तक्रारींपैकी 2 हजार 326 तक्रारी छत्रपती संभाजीनगर येथील बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनीच्या असून अमरावतीच्या गाडगेनगर पोलीस स्टेशनमध्ये 11 ऑॅगस्ट 2026 रोजी कंपनी विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ज्या तालुक्यांमध्ये येथील बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनी व इतर कंपनींविरुद्ध एकूण 41 फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



## विदर्भातील एकमेव ईडी ऑफीस ॲड. ज्ञानेश्वर वाशिमकर यांचा सत्कार

प्रतिनिधी २६ ऑगस्ट

**अकोला :** महाराष्ट्र राज्य विज तांत्रिक कामगार संघटना व. सहकारी संस्था अकोला जिल्हाच्यावतीने विदर्भातील एकमेव ईडी ऑफीसर ॲड. ज्ञानेश्वर वाशिमकर यांचा २५ ऑगस्ट रोजी १२ वाजता संघटनेच्या कार्यालयात सत्कार करण्यात आला.

बाळापूर तालुक्यातील एक छोटे गाव असलेल्या व्याळा येथील ॲड. ज्ञानेश्वर वासुदेव वाशिमकर यांनी २५ फेब्रुवारी २०२६ रोजी दिल्ली येथील ईडी हेडक्वॉटर्स येथे मुलाखत दिली संपूर्ण भारतमधून फक्त ८२ लोकांची निवड करण्यात आली. त्यामधे विदर्भातील अकोला जिल्हा येथील व्याळा गावाचे सुपुत्र ॲड. ज्ञानेश्वर वाशिमकर यांची ईडी प्रवर्तन निर्देशालय नागपूर येथे विधी अधिकारी म्हणून निवड करण्यात आली. यामुळे त्यांचा संघटनेच्यावतीने व्यवस्थापक सुनील झेड गवई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी. यावेळी एच. टी. वसु, महेश तपीले, सचिन केतकर, रविन्द्र चौखडे, जितेंद्र गवई, प्रमोद गावडे, संगित जाधव, शुभम चिम, विनोद नेवस्कर, अंनत पालखडे, प्रमोद शुक्ला, अशोक सपकाळ, भुषण सुळे, योगेश कोगदे, संघटनेचे व संस्थेचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक सुनिल गवई तर आभार अशोक सपकाळ यांनी मानले.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135